*Progressive Education Society's*
**Modern College of Arts, Science and Commerce ( Autonomous)**
**Shivajinagar, Pune-411005. Maharashtra.**

**VOLUME 10, ISSUE 9** **SEPTEMBER 2025**

# *MODLIB: E-Bulletin of Library & Information Centre*

## *Golden Moments of September 2025*







**Published by:**
**Prof. Dr. Nivedita G. Ekbote, Principal, MCASC (Autonomous), Shivajinagar, Pune-5.**
**Editor: Dr. Shantashree Sengupta, Librarian.**
**Editorial Assistant: Mrs. Sarika Sable, Clerk, Library.**
**E-mail: librarian@moderncollegepune.edu.in**

***'MODLIB'*** : E-Bulletin of Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5.

Frequency: Monthly

Mode of Publication: Online

Issue: September 2025

***Disclaimer: The Publisher and Editorial Team of this Issue of Library E-Bulletin are not responsible for the views expressed in the Articles.***

# Table of Contents


| Sr No. | Topic | Page No.s |
|---|---|---|
| 1 | **Article by Hon'ble Prof. Dr. G. R. Ekbote** | |
| | • *Viksit Maharashtratil uchcha Shikshan* | 5 |
| | • *'Atmanirbhar' Tet Shikshkanche Yogdan* | 6 |
| | • *Pudhchyas Thech, Magcha…* | 7 |
| | • *Abhiyantriki Praveshache Shivdhanushya* | 8 |
| 2 | **Felicitation of P.E. Society's Chairman Prof. Dr. G. R. Ekbote and Principal Prof. Dr. Nivedita G. Ekbote** | 9 - 10 |
| 3 | **Felicitation of P.E. Society's Joint Secretary Prof. Dr. Jyotsna G. Ekbote** | 11 |
| 4 | **Joining on and Charge Handover Ceremony to Prof. Dr. Nivedita G. Ekbote as the New Principal of Modern college, Shivajinagar, Pune-5.** | 12 - 17 |
| 5 | **Felicitation of Principal Prof. Dr. Nivedita G. Ekbote by the retired teaching faculty members of Modern College, Pune-5** | 18 |
| 6 | **Workshop on NIRF** | 19 - 36 |
| 7 | **Institutional Social Responsibility (ISR) Activity Report** | 37 - 40 |
| 8 | **Inauguration and Uploading of Generic IKS MOOC Course** | 41 |
| 9 | **Inter Collegiate Women's Volleyball Competition 2025-26** | 42 - 44 |
| 10 | **Events conducted by the Library during September 2025** | |
| | • *Raje Umaji Naik Jayanti* | 45 |
| | • *Prabodhankar Thackeray Jayanti* | 46 - 47 |
| | • *Pandit Deendayal Upadhyay Jayanti* | 48 - 49 |
| 11 | **Library Report of the visit of the Principal, IQAC/NAAC Coordinator and IQAC team of Government Science College, Gujarat** | 50 - 52 |

# *Table of Contents*


| Sr No. | Topic | Page No.s |
|---|---|---|
| 12 | **Events conducted by the Departments during September 2025** | |
| | • *GitHub Copilot Workshop, Hackathon: Department of Computer Science* | 54 - 60 |
| | • *Avishkar Competition 2025-26* | 61 - 66 |
| | • *Onam Celebrations: Department of Fashion Technology* | 67 - 68 |
| | • *News related to Departmental Library of Department of Hindi* | 69 - 74 |
| | • *CIE Research Proposal Presentation, In Translatum 2025: Department of English* | 75 - 77 |
| | • *Report of Study Tour to IISER, Pune: Department of Physics* | 78 - 80 |
| | • *Report of International Conference: Department of German* | 81 - 83 |
| 13 | **Conference/ Workshop attended by Faculty Members during September 2025** | |
| | • *Prof. Shripad Shirwalkar, Assistant Professor, Department of Performing Arts* | 85 |
| | • *Dr. Prerana Ubale, Head, Department of Hindi* | 86 |
| | • *Dr. Vaijayantimala Jadhav, Assistant Professor, Department of Marathi* | 87 - 89 |
| 14 | **Modern Achievements** | |
| | • *Dr. R. M.Jagtap, COE & Vice-Principal, Associate Professor, Department of Chemistry* | 91 |
| | • *Department of Physical Education & Sports* | 92 - 104 |
| | • *Dr. Nisha Bhandare, Head, Department of Marathi* | 105 - 106 |
| | • *P.E.Society's Sevak Sahkari Patsanstha Ltd.* | 107 |
| | • *Prof. Valmik Wagh, Department of Economics, Junior College* | 108 |
| | • *Ms. Sandhya Sonawane, M.Sc Analytical Chemistry Alumnus* | 109 |
| 15 | **Newly added and Books received in Gratis during September 2025** | 110 |
| 16 | **E-newspaper Clippings: September 2025** | 112 - 141 |
| 17 | **Upcoming Events: October 2025** | 142 |

# Article by Hon'ble Prof. Dr. G. R. Ekbote, Chairman, Progressive Education Society, Pune-5.

**प्रा. डॉ. गजानन एकबोटे**
mtedit@timesofindia.com

# विकसित महाराष्ट्रातील उच्च शिक्षण



**नुकत्याच घोषित झालेल्या 'क्यूएस' क्रमवारीत राज्य विद्यापीठांना स्थान मिळाले, ही चांगली गोष्ट आहे; परंतु भविष्यकाळात विद्यापीठांना निधी देण्यापासून प्राध्यापक नियुक्त्यांपर्यंत राज्य विद्यापीठांमध्ये भरपूर गोष्टी करण्याची आवश्यकता आहे.**

उच्च शिक्षणसंस्थांच्या जागतिक क्रमवारीत भारतीय विद्यापीठांच्या संख्येत होत असलेली वाढ गौरवास्पद असली, तरी त्यामुळे आपल्या संस्थांचा दर्जा वाढला, असा निष्कर्ष काढता येणार नाही. दर्जा उंचावण्याची प्रक्रिया निरंतर चालणारी असून, त्यासाठी भविष्यकाळात खूप काही करावे लागणार आहे. या क्रमवारीत अव्वल स्थानावरील संस्था आणि आपल्याकडील पारंपरिक विद्यापीठे यांच्यात थेट तुलना करता येणार नाही. त्यांना मिळणाऱ्या निधीपासून तेथील शैक्षणिक स्वायत्ततेपर्यंत आणि त्यांच्याकडील सुविधांपासून / संशोधनापर्यंत अनेक गोष्टींशी तुलना होऊ शकत नाही. या मानांकनाचे निकष समजून घेऊन पूर्तता करण्यालची जागरूकता देशातील संस्थांमध्ये वाढत आहे.

गेल्या दोन दशकांत, शिक्षण संस्थांच्या मानांकनाची जागतिक क्रमवारी ही उच्च शिक्षणात महत्त्वाची गोष्ट बनली आहे. विद्यार्थ्यांना विद्यापीठांची/ संस्थांची निवड करण्यास याची मदत होते. विद्यापीठांना अर्थसाह्य करणाऱ्या सरकारी व इतर योग्य संस्थांनाही निधीच्या वितरणासाठी ही क्रमवारी मार्गदर्शक ठरते. अशा यादीत भारतीय संस्थांना स्थान मिळणे निश्चितच महत्त्वाचे ठरते. अध्ययन-अध्यापनाबरोबरच संशोधनाला, नवोन्मेषाला, शिक्षण-उद्योग यांच्यातील समन्वय वाढविण्याला अधिकाधिक महत्त्व दिल्यास भविष्यकाळात आपल्याकडील अधिकाधिक विद्यापीठे या क्रमवारीत येतील. या वर्षीच्या 'क्यूएस' क्रमवारीत देशातील ५४ उच्च शिक्षण संस्थांचा समावेश झाला असून, गेल्या काही वर्षांत ही संख्या पाचपटीने वाढली आहे. अमेरिका, इंग्लंड व चीननंतर जास्तीत जास्त शिक्षणसंस्थांचा, विद्यापीठांचा या क्रमवारीत समावेश असलेला भारत चौथ्या क्रमांकावर आहे. उच्च शिक्षणातील विविध गोष्टींच्या मोजमापावर आधारित पाहणीतून शिक्षण संस्थांची जागतिक क्रमवारीची सुरुवात २००३मध्ये झाली. अॅकॅडमिक रँकिंग ऑफ वर्ल्ड युनिव्हर्सिटी, क्वाकेरेली सायमंड्स वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग, टाइम्स हायर एज्युकेशन वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग आणि वेबोमेट्रिक्स या अनुक्रमे चीन, इंग्लंड व स्पेनमधील संस्थांच्या माध्यमातून मानांकन प्रणाली अस्तित्वात आली. या सर्व संस्थांनी या पाहणीसाठी विद्यापीठांच्या विविध अंगांचा माहितीकोश, संशोधन (विशेषतः विज्ञान आणि तंत्रज्ञान शाखा), शोधनिबंधांचा माहितीकोश यांवरील माहितीचा उपयोग केला. 'क्यूएस' क्रमवारीसाठी शैक्षणिक गुणवत्ता, रोजगारक्षमता, रोजगार देणाऱ्या कंपन्यांचा अभिप्राय, शिक्षक-विद्यार्थी प्रमाण, संशोधन, शोधनिबंधांची गुणवत्ता, भविष्यकाळासाठी तयार केलेला पथ, प्लेसमेंट, उद्योगसमूहांशी सहकार्य आदी निकषांवर भर दिला जातो. विद्यापीठातील उपलब्ध शिक्षकांची शैक्षणिक पात्रता, संशोधन क्षमता, भागीदारी व विद्यार्थ्यांचा निकाल इत्यादी निकषसुद्धा विचारात घेतले जातात. या क्रमवारीतून विद्यापीठांना कामगिरीचे अवलोकन करता येते; तसेच कमकुवत निकषांकडे लक्ष वेधून सुधारणांची संधीही मिळते.

'क्यूएस'च्या यंदाच्या क्रमवारीत 'आयआयटी'चा वरचष्मा असून, त्याखालोखाल खासगी उच्चशिक्षण संस्था, केंद्रीय विद्यापीठे व अत्यल्प राज्य सरकारी विद्यापीठे आहेत. 'आयआयटी'मध्ये उच्च शिक्षणातील केवळ सहा ते सात टक्के विद्यार्थी शिक्षण घेतात. खासगी विद्यापीठांची उद्दिष्टेही भिन्नच आहेत. अशा सर्व उच्चशिक्षण संस्थांचे एकाच पद्धतीने मूल्यमापन आणि मानांकन योग्य नाही. १६८ वर्षे जुने मुंबई विद्यापीठ ६६४व्या स्थानी, तर ७५ वर्षे आयुर्मान असलेले सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ५६६व्या स्थानी आहे. सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठ ५९६व्या क्रमांकावर आहे. संत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठामध्ये ही क्षमता आहे.

देशातील उच्च शिक्षण व्यवस्थेला अनेक वर्षांपासून काही मूलभूत आव्हानांचा सामना करावा लागत आहे. अभ्यासक्रमांची कालबाह्यता, नावीन्यतेचा अभाव, संशोधन आणि उद्योगांच्या गरजांशी न जुळणारी अभ्यासक्रमांची अवस्था, राज्य विद्यापीठांची दुरवस्था, उच्च शिक्षण क्षेत्राकडे होणारे दुर्लक्ष, कौशल्य विकासाची कमतरता आणि भारतीय उच्च शिक्षण संस्थांमध्ये जागतिक स्तरावरील स्पर्धात्मकतेचा पूर्ण अभाव ही काही प्रमुख आव्हाने आहेत. परदेशी विद्यापीठांचे भारतात आगमन हे स्वागतार्ह पाऊल आहे. यात काही फायदे आणि तोटे आहेत. उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या देशात वाढत असली तरीही विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षणासाठी नोंदणीचे प्रमाण केवळ ३२ टक्क्यांच्या जवळ आहे. हे प्रमाण अमेरिका (८८ टक्के) किंवा चीन (५५ टक्के) यांच्या तुलनेत कमी आहे. महाराष्ट्रात अनेक नामांकित विद्यापीठे, संशोधन संस्था, खासगी शिक्षण संस्था, महाविद्यालये कार्यरत आहेत; परंतु दूरदृष्टीच्या नेतृत्वाचा अभाव, लवचीकतेचा अभाव, अपुऱ्या पायाभूत सुविधा, अपुरे आर्थिक पाठबळ, गुणवत्तेतील विषमता, संशोधनातील मर्यादा, जागतिक मानांकनामधील अत्यल्प विद्यापीठांचा क्रम, 'ब्रेन ड्रेन', अपुरे शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी ही गंभीर आव्हाने आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने ५० टक्के 'जीईआर'चे उद्दिष्ट ठेवले असून, त्यासाठी संस्था, दर्जेदार शिक्षक, गुणवत्तापूर्ण अभ्यासक्रम, संशोधन आणि जागतिक संस्थांचे सहकार्य गरजेचे आहे. यासाठी भारतामध्ये परदेशी विद्यापीठांना प्रवेश आवश्यक आहे. परदेशातील सरकारांच्या शिक्षणाच्या निधीतील कपातीमुळे हे देश आता भारताकडे आकर्षित होत आहेत. परदेशी विद्यापीठांच्या प्रवेशाकडे संकटाऐवजी संधी म्हणून पाहणे आवश्यक आहे. जागतिक संस्थांच्या सहकार्यामुळे भारताच्या शिक्षण पद्धतीला विकसित केले जाऊ शकेल. त्यासाठी योग्य नियोजन, शैक्षणिक गरजा ओळखणे, आर्थिक सामाजिक वास्तव ध्यानात घेणे व उत्कृष्ट पायाभूत सुविधा देणे आवश्यक आहे. ही संधी सुज्ञपणे वापरली, तर भारत विशेषतः महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षणक्षेत्रात 'जागतिक केंद्र' होण्याकडे पाऊल पुढे टाकू शकेल. देशातील 'क्यूएस' क्रमवारीत काही विद्यापीठे चमकली, तरी काही गोष्टी लवकर कराव्या लागणार आहेत. महत्त्वाचे म्हणजे, रखडलेली प्राध्यापक भरतीप्रक्रिया तावडतोब पूर्ण करायला हवी. अधिकाऱ्यांची निवड, माजी विद्यार्थी संघटना, प्लेसमेंट सेल आणि कॉर्पोरेट रिलेशन सेल, विद्यापीठाचे संकेतस्थळ, 'नॅक'कडून परीक्षण यांके लक्ष द्यावयास हवे. राज्य विद्यापीठांमध्ये राजकारणाचा प्रभाव असतो. कुलगुरूंची निवड ही एक 'राजकीय प्रक्रिया' झाली आहे. गुणवत्तेला या प्रक्रियेत अत्यल्प स्थान आहे. त्याचप्रमाणे प्राध्यापक निवडप्रक्रियेत काही विद्यापीठांमध्ये गुणवत्ता डावलून निवड झाल्याच्या तक्रारी आहेत. उच्च शिक्षणाशी संबंध नसलेल्या अनेक व्यक्तींना कुलपतींकडून प्राधिकरणांवर नामनिर्देशित केले जाते. अनेक विद्यापीठांमध्ये कुलगुरूंना दुय्यम स्थान असून नामनिर्देशित व्यक्तींच्या शब्दांना मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. विद्यापीठाच्या प्राधिकरणांमध्ये तज्ज्ञ, अभ्यासू, प्रामाणिक व्यक्तींची नियुक्ती / नामनिर्देशन झाले पाहिजे. सध्याच्या विद्यापीठ कायद्यामध्ये आणि विद्यापीठांतील निर्णयप्रक्रियेत नव्या शैक्षणिक धोरणातील तरतुदींनुसार तावडतोब बदल होणे आवश्यक आहे. सध्याची पद्धती किचकट व वेळकाढू आहे. त्यामुळे आपले अभ्यासक्रम कालानुरूप बदलत नाहीत. उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये पुढील सुधारणा आवश्यक आहेत...

सरकारी विद्यापीठाची संख्या वाढविणे. प्रत्येक जिल्ह्यात एक विद्यापीठ, उत्कृष्ट उच्चशिक्षण देणारी संस्था हवी. संबंधित महाविद्यालयांची संख्या २५० वर नसावी. अभ्यासक्रमात नियमित कालानुरूप बदलांची सोपी प्रक्रिया हवी. वार्षिक परीक्षेची पद्धत बदलून अंतर्गत गुणवत्तेला महत्त्व हवे. प्राध्यापकांच्या सेवाशर्तींमध्ये कालानुरूप बदल महत्त्वाचे आहेत. विद्यापीठे व उच्च शिक्षणसंस्थांना सरकारची आर्थिक मदत हवी. उच्च शिक्षण घेणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांना शुल्कामध्ये सवलती, आर्थिक साह्य, बँकांचे कर्ज मिळाले तरच देशाचा 'जीईआर' वाढेल. खासगी उद्योग आणि विद्यापीठे, उच्च शिक्षण संस्थांचे एकमेकांशी सहकार्य वाढणे आवश्यक आहे.

**(लेखक शिक्षणतज्ज्ञ व प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष आहेत.)**

Maharashtra Times 4.9.2025

# Article by Hon'ble Prof. Dr. G. R. Ekbote, Chairman, Progressive Education Society, Pune-5.

प्रभात

# 'आत्मनिर्भर'तेत शिक्षकांचे योगदान

शैक्षणिक

- प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे

स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी लाल किल्ल्यावरून राष्ट्राला संबोधित करताना पंतप्रधानांनी २०४७ पर्यंत समृद्ध भारत निर्माण करण्यासाठी स्वदेशी आणि आत्मनिर्भर भारताचे आवाहन केले. आत्मनिर्भरता आणि विकासाच्या दिशेने भारताचा प्रवास हा एक महत्त्वाकांक्षी राष्ट्रीय प्रयत्न आहे, ज्याच्या केंद्रस्थानी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी) २०२० आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण शिक्षकांना 'परिवर्तक' म्हणून मानते. ते भावी पिढ्यांना जबाबदार, कुशल आणि सुसंस्कृत नागरिकांमध्ये आकार देतात. पंतप्रधानांनी या संदर्भात शिक्षकांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर सातत्याने भर दिला आहे. ते म्हणाले, आई-वडील जन्म देतात, गुरू जीवन देतात. हे जीवनदाता या भव्य इमारतीचा आत्मा आहेत. ज्या शाळेची इमारत सरकार बांधू शकते, ती शरीरासारखी आहे, परंतु शिक्षक म्हणजे गुरू त्यातील आत्मा आहे.

एनईपी लागू झाल्यामुळे, शिक्षक पारंपरिक, पाठांतर-आधारित शैलीपासून अधिक विद्यार्थी-केंद्रित, नावीन्यपूर्ण दृष्टिकोनाकडे व शिक्षण पद्धतीकडे वळत आहेत. यामध्ये विद्यार्थ्यांच्या सामाजिक, भावनिक, शारीरिक आणि संज्ञानात्मक कल्याणावर लक्ष केंद्रित करून त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे समाविष्ट आहे. शिक्षकांनी आता सर्जनशीलता, जिज्ञासा, विश्लेषण करण्याची सवय आणि समीक्षात्मक विचारांना प्रोत्साहन देताना मूल्ये, भारताच्या तरुणांमध्ये अभिमानाची भावना निर्माण करणे अपेक्षित आहे. विशेष गरजाअसलेल्या आणिउपेक्षितसमुदायातील विद्यार्थ्यांसह सर्व विद्यार्थ्यांच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी सर्वसमावेशकता आणि समानतेला प्रोत्साहन देण्यात शिक्षक नेहमीच आघाडीवर आहेत.

आज, आपण एका परिवर्तनाचे साक्षीदार आहोत. आपण शिकतो, शिकवतो आणि शिक्षणात सहभागी असणाऱ्या प्रत्येकाच्या कौशल्यांचा विकास करतो. एनईपी आणि शालेय शिक्षणासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (एनसीएफ-एसई) २०२३ ची मार्गदर्शक तत्त्वे प्रत्येक विद्यार्थ्याच्या अद्वितीय क्षमता विकसित करण्यावर भर देतात. यामध्ये लवचिक शिक्षण, बहुविद्याशाखीय शिक्षण, बहुभाषिकता, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि विविधतेचा आदर याचा समावेश आहे. एनईपीच्या अंमलबजावणीला पाच वर्षे झाली आहेत. शिक्षकांचे सक्षमीकरण आणि शिक्षणात सुधारणा करण्यासाठी अनेक उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. बहुशाखीय दृष्टिकोन स्वीकारणारा सरकारचा एकात्मिक शिक्षक शिक्षण कार्यक्रम (आय.टी.ई.पी.) वेगाने विकसित होत असलेल्या शैक्षणिक परिस्थितीच्या आव्हानांसाठी उत्साही आणि व्यावसायिक प्रशिक्षित शिक्षकांची एक नवीन पिढी तयार होत आहे. हे निश्चितच आनंददायक व समाधानकारक आहे.

शिक्षकांना सक्षम करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे निकाल सुधारण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण शिक्षकांच्या क्षमता वाढीवर महत्त्वपूर्ण भर देते. रवींद्रनाथ टागोरांनी म्हटल्याप्रमाणे, एक शिक्षक जोपर्यंत स्वतः शिकत नाही, तोपर्यंत तो खरोखर शिकवू शकत नाही. एक दिवा जोपर्यंत स्वतःची ज्योत पेटवत नाही, तोपर्यंत तो दुसरा दिवा कधीही पेटवू शकत नाही. शासनाने मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम यासारखे कार्यक्रम सुरू केले आहेत. अनुभवात्मक, कला-एकात्मिक आणि क्रीडा-एकात्मिक

**गेल्या काही वर्षांत डिजिटल आणि मिश्रित (Hybrid) शिक्षणामध्ये अभूतपूर्व बदल झाला आहे. या संक्रमणाने आव्हाने उभी केली असताना, त्यासाठी शिक्षकांनी लवचिकता आणि अनुकूलतादेखील दर्शविली आहे.**



शिक्षण, तसेच डिजिटल साक्षरता आणि क्षमता-आधारित शिक्षण यासारख्या नवीन अध्यापन शास्त्रांमध्ये सतत शिकण्याच्या संधी प्रदान करणे, हे सध्या शिक्षणाचे व्यापक उद्दिष्ट आहे. 'डायट्स ऑफ एक्सलन्स' उपक्रम हा शिक्षकांच्या शिक्षणासाठी मॉडेल केंद्रांमध्ये सर्व कार्यशील जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्थांचे रूपांतर करण्याचा एक धोरणात्मक प्रयत्न आहे. व्यावसायिक विकास, संशोधन आणि नावीन्यपूर्णतेसाठी गतिमान केंद्रे तयार करून, हा उपक्रम हे सुनिश्चित करते की शिक्षक शिक्षण प्रणालीच्या विकसनशील मागण्या पूर्ण करण्यासाठी सुसज्ज आहेत.

आज, शिक्षक बदलत्या जगाशी वेगाने जुळवून घेत आहेत- डिजिटल वर्ग, कृत्रिम बुद्धिमत्ता, बदलते अभ्यासक्रम आणि विविध शैक्षणिक गरजा. पीएम ई-विद्या, दीक्षा आणि स्वयम् सारखे मंच शिक्षकांना साधने, प्रशिक्षण आणि उच्च दर्जाच्या सामग्रीसह सुसज्ज करत आहेत, अशा प्रकारे एक डिजिटल शिक्षण परिसंस्था तयार होत आहे. शिवाय, शिक्षकांचे शिकवण्याचे परिणाम वाढवण्यासाठी एआय-संचालित साधने, वैयक्तिककृत मूल्यमापन आणि डेटा-चालित अंतर्दृष्टी विकसित केली जात आहे. सर्वांचा विश्वास आहे की तंत्रज्ञान कधीही शिक्षकांची जागा घेणार नाही, तंत्रज्ञानामुळे शिकवण्याची, गुंतवून ठेवण्याची आणि प्रेरणा देण्याची शिक्षकांची क्षमता वाढेल.

अलीकडील आकडेवारीच्या आधारे, भारताकडे जगातील सर्वात मोठे शिक्षण कार्यबल असल्याचा अंदाज आहे- शाळांपासून ते उच्च शिक्षण संस्थांपर्यंत सर्व स्तरांवर सुमारे १.१६ कोटी शिक्षक शिक्षण व्यवस्थेत कार्यरत आहेत. विकसित भारताचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ही एक महत्त्वपूर्ण संपत्ती आहे. एक मोठी, पात्र शिक्षण शक्ती मानवी भांडवलाचे परिवर्तन करून, आर्थिक वाढीस चालना देऊन आणि अधिक न्याय्य समाजाला प्रोत्साहन देऊन देशाच्या विकासाला, आत्मनिर्भरतेत चालना देऊ शकते.

स्वतःचे भविष्य बाजूला ठेवून विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी झटणारे, आधी केले मग सांगितले या उक्तीप्रमाणे, स्वतः अभ्यास करून विद्यार्थ्यांसमोर आदर्श निर्माण करणारे, पदवी, चांगले गुण आणि इतर सन्मानापेक्षा ज्यांचे विद्यार्थी फक्त पाठीवरच्या कौतुकाची थाप मिळण्याची वाट पाहतात, ते पूज्य व आदरणीय शिक्षक. स्वतःचा संसार आणि सुख-दुःख बाजूला ठेवून विद्यार्थ्यांसाठी झटणारे, अडचणीच्या काळातही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रक्रियेतील सहभागासाठी प्रयत्न करणारे, ज्यांचे आशीर्वाद आणि पाठीवरची थाप आयुष्यातील प्रत्येक लढ्यात ऊर्जा देतात, ते पूज्य व आदरणीय शिक्षक.

शिक्षक आत्मनिर्भर आणि विकसित भारताचे शिल्पकार आहेत. शिक्षक म्हणजे उद्याचे शास्त्रज्ञ, शासकीय अधिकारी, नवप्रवर्तक, विचारवंत आणि नेते यांना आकार देणारी प्रेरक शक्ती. संशोधन, गंभीर विचार करणे आणि समस्या सोडवण्याच्या संस्कृतीला चालना देऊन, शिक्षक विद्यार्थ्यांना केवळ नोकरी शोधणाऱ्यांपासून नावीन्यपूर्ण नोकरी- निर्मात्यांमध्ये विकसित होण्यासाठी तयार करीत आहेत. शिवाय, शिक्षक मजबूत नैतिकता आणि लवचिकता निर्माण करून, शिक्षक केवळ स्वतःचीच नव्हे तर समाज आणि मानवतेच्या व्यापक गरजांची सेवा करण्यासाठी, प्रत्येक वर्गाला आत्मनिर्भर भारताचा पायाभूत घटक बनवण्यासाठी तयार आहेत. शिक्षक नेहमी कुतूहल जागृत करणे, धैर्य वाढवणारे आणि विद्यार्थ्यांना स्वावलंबी, सशक्त आणि प्रबुद्ध राष्ट्र निर्माण करण्यासाठी प्रेरित करणारे रहावे.

Pune City Edition
Sep 09, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

# Article by Hon'ble Prof. Dr. G. R. Ekbote, Chairman, Progressive Education Society, Pune-5.

प्रभात

## पुढच्यास ठेच, मागचा...

लक्षवेधी

- प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे

**तरुणवर्गाच्या समस्या सोडविण्याकडे नेपाळच्या राज्यकर्त्यांचे दुर्लक्ष झाल्यामुळे तरुणांमधील असंतोष प्रचंड वाढला आणि त्यांनी सत्ता उलथवली. यातून भारताने शहाणे व्हावे.**



सध्याच्या काळातील जागतिक परिस्थिती दक्षिण आशियातील राजकीय आणि सामाजिक घडामोडींकडे पाहिले तर खूप गुंतागुंतीची आणि धोकादायक दिसते. एकेकाळी जगाच्या नकाशावर 'सभ्यता', 'स्थिरता' आणि 'संस्कृती' यांचा वारसा जपणारा हा भाग, आता प्रचंड अस्थिरता, आर्थिक संकट, धार्मिक व जातीय संघर्ष, राजकीय भ्रष्टाचार, चारित्र्यहीन राजकीय नेते, भ्रष्ट शिक्षण पद्धती, बेरोजगारी, महागाई आणि युवकांचा प्रचंड असंतोष या सर्वांचा केंद्रबिंदू झाला आहे.

युवकांच्या आशा-आकांक्षा, अपेक्षा समजून घेतल्या नाहीत, तर त्या देशाचा पाया डगमगतो, हे नेपाळचे उदाहरण स्पष्ट करते. नेपाळमध्ये गेल्या दोन दशकांत मोठ्या राजकीय उलाढाली झाल्या. राजेशाही कोसळली, प्रजासत्ताक आले. साम्यवादी आणि प्रजातांत्रिक, लोकशाही शक्तींचे सत्तेसाठी संघर्ष सुरू राहिले. पण या संघर्षात एक गोष्ट सतत दुर्लक्षित झाली ती म्हणजे युवकांची मन:स्थिती, जिला जेन-झी म्हटले जाते. जेन-झी म्हणजे १९९७ नंतर जन्मलेले युवक-युवती. मोबाइल, इंटरनेट, समाज माध्यमे यांचा परिचय असलेली ही पिढी साऱ्या जगाशी जोडलेली आहे. त्यामुळे त्यांची विचारक्षमता, आकलनक्षमता, मानसिक अवस्था यांना त्यांच्या देशाच्या मर्यादा नसतात. नेपाळातील युवकांच्या अपेक्षा त्यांच्या लहानपणापासूनच स्पष्ट आहेत. त्यांना दर्जेदार व आधुनिक शिक्षण, पारदर्शक शासन, रोजगाराच्या संधी, भ्रष्टाचारमुक्त वातावरण, चारित्र्यवान नेते हे हवे आहे. परंतु, पारंपरिक नेत्यांच्या स्वार्थी राजकारणात त्यांना हे द्यायला हवे याकडे लक्षच दिले गेले नाही. तरुणांच्या अपेक्षांकडे पार दुर्लक्ष झाले आणि परिणामी असंतोष वाढत गेला. समाज माध्यमांच्या वापरावरील बंदी हे उद्रेकाचे तत्कालिक कारण होते.

नेपाळी युवकांचा राग केवळ एका पक्षावर किंवा सरकारवर नाही. त्यांचा राग संपूर्ण देशातील परिस्थितीविरुद्ध, व्यवस्थेविरुद्ध आहे. भारताचे बरेच शेजारी देश संकटात सापडलेले दिसतात. पाकिस्तानमध्ये परिस्थिती स्फोटक आहे. तेथे अनागोंदीच आहे. अफगाणिस्तानात अमेरिकेच्या माघारीनंतर तालिबानची सत्ता आली. बांगलादेश आणि नेपाळमधील घटनांमधून एक संदेश मिळतो, तो असा की, युवकांना दुर्लक्षित केले, त्यांना गृहीत धरले, त्यांच्या आशा, आकांक्षा, अपेक्षा याकडे दुर्लक्ष केले तर संपूर्ण देश कधीही संकटात येतो.

लोकशाहीत सरकार बदलतात हे नैसर्गिक व सत्य आहे. शेजारी देशांतील सत्ता मात्र उलथवली गेली. त्यामागे परकीय शक्ती असल्याची चर्चा आहे. मुख्य कारण म्हणजे शासन आणि जनता यांच्यातील वाढलेली प्रचंड दरी, लोकांच्या व युवकांच्या अपेक्षा वाढल्या, पण सरकारने प्रतिसाद दिला नाही. भ्रष्टाचार, घराणेशाही, बेरोजगारी, जातीयवाद, चारित्र्यहीनता आणि अकार्यक्षमता यामुळे जनतेचा विश्वास नष्ट होतो. त्यासाठी जनता थेट सत्तेला आव्हान देते. त्यासाठी युवक पुढाकार घेतात. हेच नेपाळमध्ये, श्रीलंका, बांगलादेश येथे घडले. भारत आणि नेपाळ यांचे नाते केवळ शेजाऱ्यांचे नाही ते सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरांनी जोडलेले आहे. भारतीयांचा मोठा व्यापार आणि वावर नेपाळमध्ये आहे. म्हणूनच नेपाळातील अस्थिरता भारतासाठी धोकादायक आहे. नेपाळी युवकांवर अनेक शक्तीचा प्रभाव आहे. साम्यवादाचा प्रभाव आहे. कारण तेथील माओवादी चळवळींनी दीर्घकाळ युवकांना आकर्षित केले. आर्थिक गुंतवणूक, पायाभूत प्रकल्प, प्रचंड कर्ज, हिंसाचाराला प्रोत्साहन देणारे तत्त्वज्ञान या माध्यमांतून चीनचा नेपाळमधील प्रभाव वाढेल. समाज माध्यमांमुळे अमेरिकन, युरोपीय, आशियाई विचार थेट नेपाळी युवकांपर्यंत पोहोचतात. त्यामुळे असंख्य भारतीयांच्या नजरेत ते नुसते गुरखे नाहीत. आधुनिकता, साम्यवाद, राष्ट्रवाद, जागतिकीकरण, खासगीकरण यांच्या गुंतागुंतीशी तेथील युवक संघर्ष करीत आहेत. आता जगातील कोणताही युवकवर्ग घ्या, तो जगाशी जोडलेला असणे स्वाभाविकच अमेरिकेत समलैंगिक विवाह कायदेशीर ठरतो, त्यातही भारतातील युवक त्याबद्दल चर्चा करतात. ते ट्रम्प यांच्या विदुषकी कृत्यांची चर्चा करतात. युरोपात पर्यावरण प्रश्न महत्त्वाचे ठरतात, तर त्यावर भारतीय विद्यार्थी आवाज उठवतात. तेच नेपाळमध्येही घडत आहे. त्यातून त्यांच्या आशा-आकांक्षा, अपेक्षा विकसित झाल्या, त्यांची राज्यकर्त्यांनी दखल घेणे जरूरीचे होते. त्यांना ते जमले नाही म्हणून नेपाळमध्ये या घटना घडल्या. या तुलनेत भारताची सर्वात मोठी ताकद म्हणजे येथील लोकशाही, न्यायव्यवस्था, संसद आणि घटना. समाज माध्यमे ही ताकद अशी आहे की तो भौगोलिक सीमारेषा पुसून टाकते. त्यामुळे यापुढे युवकांना थांबवणे अवघड होईल. अशा स्थितीत त्यांना व त्यांच्या विचारांना योग्य दिशा देणे त्यांच्या यापुढे आशा, अपेक्षा, आकांक्षा यांचा विचार करणे हाच उपाय ठरतो.

आपण म्हणतो की, भारताचा युवकवर्ग हीच आपली सर्वात मोठी ताकद आहे. युवकांच्या बळावरच भारत महासत्ता होण्याचे स्वप्न पाहतो, त्या स्वप्नाचा पाया म्हणजे युवकांची ऊर्जा, कौशल्य, शक्ती आणि त्यांचा देशाच्या विकासातील सहभाग. त्यांची ऊर्जा विध्वंसाकडे, हिंसाचाराकडे जायला नको, याची काळजी घेण्याची जबाबदारी राज्यकर्त्यांची आणि समाजधुरिणांची आहे. युवकांचा उत्साह आंदोलनांपुरता, सभा संमेलनांपुरता मर्यादित न ठेवता त्यांना समाजकार्यात, शिक्षणात, आरोग्य सेवेत, सेवा प्रकल्पांमध्ये, संशोधनात, उद्योजकांत, संस्कृतीकडे वळवले पाहिजे. युवकांमध्ये आधुनिकतेसोबतच आपल्या परंपरा, इतिहास, मूल्ये, संस्कृती, चारित्र्य, राष्ट्रभक्ती इत्यादी यांची जाणीव विकसित करणे अत्यंत आवश्यक आहे. यातून सशक्त, समर्थ देश निर्माण होतो. आणखी एक गोष्ट करणे आवश्यक आहे ती म्हणजे युवकांमध्ये वाचन संस्कृती, विश्लेषण करण्याची शक्ती वाढवण्याची गरज आहे. समाज माध्यमांमध्ये युवकवर्ग सतत गुंतलेला असतो. त्यांना पुस्तकांच्या वाचनाकडे जाणीवपूर्वक वळविले पाहिजे, जेणेकरून त्यांना वैचारिक खाद्य देता येईल. त्यांच्यावर सभ्यता, संस्कृती यांचे संस्कार होतील. भारताच्या सध्याच्या व्यवस्थेत संसदीय, लोकशाही, शिक्षण, न्यायव्यवस्था, उद्योगधंद्यांची वाढ, शिक्षण, देशांची घटना, लोकसंख्या, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी महत्त्वाच्या गोष्टी आहेत.

Pune City Edition
Sep 19, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

# Article by Hon'ble Prof. Dr. G. R. Ekbote, Chairman, Progressive Education Society, Pune-5.

**डॉ. गजानन एकबोटे**
mtedit@timesofindia.com

# अभियांत्रिकी प्रवेशाचे शिवधनुष्य

**उच्च व तंत्रशिक्षण विभागाद्वारे अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी राज्यस्तरीय प्रवेश प्रक्रिया (सीईटी व कॅप) राबवली जाते. यंदा प्रवेशप्रक्रियेत काही सुधारणा झाल्या असल्या, तरी अजूनही अडचणी कायम आहेत.**



अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी यंदा प्रवेश परीक्षा दर वर्षीच्या तुलनेने साधारणपणे १५ ते २० दिवस आधी घेण्यात आली; तरी निकाल १६ जून रोजी जाहीर झाला. त्यानंतर प्रवेशप्रक्रिया साधारणपणे १५ दिवसानंतर जून महिन्याअखेरीस सुरू झाली व १५ सप्टेंबर रोजी संपली. म्हणजेच त्यासाठी एकूण अडीच महिन्यांचा कालावधी लागला. यापूर्वीच्या प्रवेशप्रक्रियांशी तुलना केल्यास, यंदा कालावधी खूप जास्त असल्याचे प्रकर्षाने जाणवले. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेशप्रक्रियेमध्ये काही बदल व सुधारणा झाल्या असल्या, तरी काही अडचणी या कायम राहिल्याचे दिसते. यंदा महत्त्वाचे बदल झाले त्यापैकी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (सेंट्रलाइज्ड ॲडमिशन) वाढलेल्या फेऱ्या व संस्थात्मक प्रवेशाच्या प्रक्रियेतील बदल या काही ठळक बाबी विशेष नमूद करण्यासारख्या आहेत.

दर वर्षीप्रमाणे राबवण्यात येणाऱ्या संपूर्ण ऑनलाइन पारदर्शक प्रवेशप्रक्रियेमुळे अर्ज भरणे, कागदपत्रे अपलोड करणे व पसंती क्रमांक (ऑप्शन) भरणे, यांमुळे विद्यार्थ्यांचा वेळ व प्रवासखर्च मोठ्या प्रमाणात वाचण्यास मदत झाली. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमुळे प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या गुणांनुसार व प्राधान्यानुसार प्रवेश मिळण्यास मदत झाली. ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना समान निकषांवर संधी उपलब्ध झाल्या. पूर्वनियोजित व स्थिर वेळापत्रकामुळे विद्यार्थ्यांना प्रवेशाची पूर्वतयारी करणे सोपे झाले. कागदपत्रांच्या डिजिटल पडताळणीमुळे गैरप्रकार व चुका कमी होण्यास मदत झाली. संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रिया ही अधिक पारदर्शक व प्रवेशाच्या संधी उपलब्ध करून देणारी ठरली. या केंद्रीभूत प्रवेशप्रक्रियेमध्ये तीनऐवजी चार प्रवेशफेऱ्या घेण्यात आल्या. यामध्ये निदर्शनास आले, की पहिल्या फेरीनंतर दुसऱ्या फेरीत बहुतांश विद्यार्थ्यांना 'बेटरमेंट' मिळाले. परंतु दुसऱ्या फेरीनंतर शेवटच्या फेरीपर्यंत बहुतांश विद्यार्थ्यांनी बेटरमेंटचा पर्याय निवडूनदेखील त्यांच्या 'ॲलॉटमेंट'मध्ये विशेष बदल झाला नाही.; किंबहुना चौथ्या फेरीअखेरीस अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या साधारण ३० टक्के जागा रिक्त राहिल्या.

यंदाच्या शैक्षणिक वर्षासाठी अभियांत्रिकीच्या एकूण २, ०२, ६६८ जागा उपलब्ध होत्या. त्यापैकी १, ६६, ७४६ जागांसाठी विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केले. यामध्ये जवळपास ३६,३३२ प्रवेश हे संस्थास्तरावरील राबविलेल्या प्रवेशप्रक्रियेतून निश्चित करण्यात आले. गतवर्षीच्या तुलनेत जवळपास १७, ७००पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी अभियांत्रिकी अभ्यासक्रमाला पसंती दिली असतानादेखील तब्बल ३६, १६४ जागा रिक्त राहिल्या. 'सीईटी सेल'ने संस्थास्तरावरील प्रवेशप्रक्रियेमध्ये केलेल्या बदलांमुळे या जागांवर प्रवेश घेण्यासाठी इच्छुक विद्यार्थी व पालकांमध्ये निरुत्साह जाणवला. या प्रवेशांमध्येदेखील घट झाल्याचे दिसून आले.

वरील सर्व बाबींचा विचार करता, चार प्रवेशफेऱ्या घेणे कितपत उपयोगी ठरले, हा प्रश्न उपस्थित होतो. पूर्वीच्या कुठल्याही प्रवेशप्रक्रियेमध्ये तीनपेक्षा जास्त फेऱ्या घेण्यात आल्या नव्हत्या; किंबहुना काही वर्षांपूर्वी दोन प्रवेशफेऱ्यांमध्येच संपूर्ण प्रवेशप्रक्रिया यशस्वीपणे राबविण्यात आली होती. चार प्रवेशफेऱ्यांमुळे विद्यार्थी, पालक व संस्थांचा विनाकारण वेळ, पैसा व ऊर्जा खर्च झाली, असे वाटते. तसेच खासगी विद्यापीठांच्या तुलनेने नवीन शैक्षणिक वर्ष किमान एक महिना उशिरा सुरू झाल्यामुळे अभ्यासक्रम सुलभतेने पूर्ण करण्यास प्रचंड अडचणी येतात व त्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान होऊ शकते. त्याचप्रमाणे चांगले हुशार विद्यार्थी लवकर प्रवेश होत असल्याने खासगी विद्यापीठांमध्ये प्रवेश घेतात.

केंद्रीभूत फेऱ्यांनंतर रिक्त राहिलेल्या जागांवर प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांना आपल्या आवडीच्या महाविद्यालयात स्वतंत्र अर्ज करून प्रवेश घ्यावा लागतो. या प्रवेशफेऱ्या सर्व महाविद्यालयांमध्ये एकाच दिवशी व बऱ्याचदा एकाच वेळी राबवण्यात येतात. त्यामुळे विद्यार्थी व पालकांची तारेवरची कसरत होते व प्रचंड घोळ होतात. केंद्रीभूत प्रक्रियेप्रमाणे या फेऱ्यांमध्ये कोणताही 'फ्रीझ' हा पर्याय नसल्यामुळे अनेक विद्यार्थी एका महाविद्यालयामध्ये पसंतीप्रमाणे प्रवेश मिळवूनदेखील, तो रद्द करून दुसऱ्या महाविद्यालयात प्रवेश घेताना दिसून आले, काही विद्यार्थी तर तिसऱ्या, चौथ्या महाविद्यालयातदेखील प्रवेशासाठी धडपड करताना दिसून आले, त्यामुळे प्रवेशासाठीचे दुष्टचक्र शेवटच्या दिवसाच्या अंतिम क्षणापर्यंत सुरु राहिले. परिणामी महाविद्यालयांच्या; तसेच विध्यार्थ्यांच्या दृष्टीने ही प्रवेशप्रक्रिया अतिशय क्लिष्ट व त्रासदायक ठरली. या प्रवेशप्रक्रियेत प्रवेश घेतलेले विद्यार्थी व तत्पूर्वी केंद्रीभूत प्रवेशप्रक्रियेमधून प्रवेश घेतलेले विद्यार्थी यांच्या गुणांमध्येदेखील प्रचंड तफावत जाणवते. विविध प्रवर्गातील जागांचे प्रमाण, त्यातील बदल आरक्षणाच्या गुंतागुंती समजण्यात अनेकांना अडचणी येतात. रिक्त जागांमधील विविध प्रवर्गांनुसार जागांची उपलब्धता (सीट मेट्रिक्स) रोजच्या रोज 'सीईटी सेल'कडून विद्यार्थी व संस्थांना उपलब्ध करून दिली जात नाही. या सर्व गोष्टींचा विचार करता रिक्त जागांवरील प्रवेशाची प्रक्रिया ही अधिक सक्षम सोपी व सुटसुटीत करण्याची गरज जाणवते.

संस्था स्तरावरील (२० टक्के जागा) प्रवेशप्रक्रियेमध्ये या शैक्षणिक वर्षापासून आमूलाग्र बदल झाल्याचे दिसून येते. शुल्क नियामक प्राधिकरणाच्या निकषांनुसार या वर्षी संस्थास्तरावरील प्रवेशासाठी सर्व संस्थांना त्यांच्या नियमित शुल्काच्या कमाल तिप्पट शुल्क आकारण्याची मुभा देण्यात आली होती. या निर्णयामुळे अनेक महाविद्यालयांचे एका वर्षाचे शुल्क सहा लाखांहून जास्त असल्याचे दिसून आले. म्हणजे चार वर्षांच्या अभ्यासक्रमासाठी एकंदरीत २५ लाख इतके भरमसाठ शुल्क भरण्याची वेळ पालकांवर आली. या निर्णयामुळे समाजातील सर्व स्तरांतील विद्यार्थ्यांना; विशेषतः गरीब व मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांना अशा महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेण्यापासुन वंचित राहावे लागले. संस्था स्तरावरील प्रवेशप्रक्रिया व केंद्रीभूत प्रवेशप्रक्रिया आणि नंतर रिक्त राहिलेल्या जागांची प्रवेशप्रक्रिया एकाच वेळेस असल्यामुळे नेमक्या कुठल्या प्रक्रियेमध्ये सहभाग घ्यावा; जेणेकरून आपल्याला हवे असलेल्या महाविद्यालय व शाखेमध्ये प्रवेश निश्चित करता येईल, याबद्दल विद्यार्थी व पालकांमध्ये संभ्रम निर्माण झाला. त्यामुळे ही प्रक्रिया खूप रेंगाळलेली, दीर्घकाळ चालणारी व कंटाळवाणी झाली. त्याचा सर्वात मोठा फटका हा संस्था स्तरावरील उपलब्ध जागांना बसला व त्या रिक्त राहिल्या. हा पर्याय ठेवला असता तर ते विद्यार्थी, पालक आणि संस्था या सर्वांच्या हिताचे ठरले असते.

एकंदरीत, इंजिनिअरिंग प्रवेश प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी अनेक सकारात्मक पावले उचलली गेली आहेत. तरीसुद्धा तांत्रिक त्रुटी, वेळापत्रकातील विलंब व माहितीची अस्पष्टता या बाबींवर अजून काम करण्याची आवश्यकता आहे. प्रवेशप्रक्रिया अधिक सुरळित, वेळेवर आणि विद्यार्थ्यांच्या हिताची करण्यासाठी सरकार व तंत्रशिक्षण विभागाने सातत्याने सुधारणा करणे गरजेचे आहे, त्यासाठी संस्थाचालक, प्राचार्य या घटकांशी चर्चा करून पुढील वर्षासाठी प्रवेशप्रक्रियेबाबत निर्णय घ्यावा लागेल. एक मात्र ठळक निष्कर्ष काढला जातो. या वर्षीची प्रवेशप्रक्रिया रेंगाळलेली, विद्यार्थी, पालक व महाविद्यालयांची सहनशीलता ताणणारी आणि त्रासदायक होती. चारऐवजी तीन फेऱ्या घेतल्या असत्या तर ते सर्वांच्या हिताचे झाले असते.

**(लेखक ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ आणि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष आहेत.)**

Maharashtra Times Pune Edition 28.9.2025 and Maharashtra Times Mumbai Edition 3.10.2025

# Felicitation of Progressive Education Society Chairman Hon'ble Prof. Dr. G. R. Ekbote and Prof. Dr. Nivedita G. Ekbote, Principal, Modern College, Shivajinagar, Pune-5

आज अखिल भारतीय ब्राम्हण महासंघाच्या वतीने ज्येष्ठ शिक्षणकर्मी प्रा.डॉ गजानन एकबोटे सर यांना पहिल्या "शिक्षण रत्न जीवन गौरव" पुरस्काराने गौरविण्यात आले. महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ गोविंद राव कुलकर्णी आणि महाराष्ट्र राज्याचे Director Of Higher Education, डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. अत्यंत देखण्या कार्यक्रमाला समाज बांधव आणि भगिनी खुप मोठ्या संख्येने उपस्थित होते. याच कार्यक्रमात Dr. Nivedita Ekbote यांची मॉडर्न कॉलेजच्या







# Newspaper Coverage of the Jeevan Gaurav Shikshanratna Puraskar awarded to Hon'ble Prof. Dr. G. R. Ekbote, Chairman, P.E.Society

सकाळ

# डॉ. गजानन एकबोटे यांना जीवनगौरव

**पुणे, ता. ११ :** "नवीन शिक्षण प्रणाली अनेक सकारात्मक बदल घडून आणेल व यामुळे शिक्षकांना त्यांच्या कौशल्यविकासाला वाव मिळेल," असे प्रतिपादन प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन डॉ. गजानन एकबोटे यांनी केले.

शिक्षक दिनाचे औचित्य साधून अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ पुणे जिल्हा शिक्षक आघाडीतर्फे आयोजित कार्यक्रमात डॉ. एकबोटे यांना जीवनगौरव शिक्षणरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या वेळी ते बोलत होते. उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ७५ शिक्षकांना या वेळी गौरविण्यात आले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उच्चशिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर तसेच अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. गोविंद कुलकर्णी, जिल्हाध्यक्ष मंदार रेडे, शिक्षक आघाडी अध्यक्ष राजेंद्र जोशी उपस्थित होते.

शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल प्रा. माधवी नानल, प्रदीप पुराणिक व मेघना भावे या शिक्षकांचा शिक्षणरत्न पुरस्काराने गौरव करण्यात आला. मॉडर्न कॉलेजच्या प्राचार्यपदी निवड झाल्याबद्दल प्रा. निवेदिता एकबोटे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. डॉ. देवळाणकर यांनी मार्गदर्शन केले. डॉ. कुलकर्णी यांनी आत्मनिर्भर उद्योजक घडविण्यासाठीच्या योजनांची माहिती दिली. रेडे यांनी आगामी काळात सर्व शिक्षणतज्ज्ञ शिक्षकांची एक राज्यस्तरीय समिती तयार करून संपूर्ण महाराष्ट्रातील शिक्षक कौशल्यविकासाला प्राधान्य देणार असल्याचे सांगितले. प्रा. जोशी यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाच्या आयोजनात प्रा. शुभांगी दौतखाने, भाग्यश्री सुपनेकर, वैशाली कमाजदार, हर्षद गाडगीळ, विकास कंकाळ, वसंत कुलकर्णी यांनी सहभाग घेतला. गीता देशमुख व ममता कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. श्रुती कुलकर्णी यांनी आभार मानले.



**वेदशास्त्रोतेजक सभा, सारसबाग :** अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ पुणे जिल्हा शिक्षक आघाडीतर्फे डॉ. गजानन एकबोटे यांना जीवनगौरव शिक्षणरत्न पुरस्काराने सन्मानित करताना मान्यवर.

Pune, Pune-Today
12/09/2025 Page No. 8

# Felicitation of Hon'ble Prof. Dr. Jyotsna G. Ekbote, Joint Secretary, P.E Society, Pune-5 and Chairperson, CDC, Modern College, Pune-5

व्यवस्थापन परिषद, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या वतीने आमच्या महाविद्यालय विकास समितीच्या अध्यक्षा व संस्थेच्या सहकार्यवाह आदरणीय प्रा. डॉ. ज्योत्स्ना गजानन एकबोटे यांना प्राप्त झालेल्या "आदर्श माता" या मानाच्या पुरस्काराबद्दल त्यांचा आज सत्कार करण्यात आला.





# Joining of and Charge Handover Ceremony to Prof. Dr. Nivedita Gajanan Ekbote as the New Principal of Modern College, Shivajinagar, Pune-5








Prof. Dr. Nivedita Gajanan Ekbote joined as the new Principal of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune on 2nd September 2025. Progressive Education Society's Chairman Hon'ble Prof. Dr. G. R. Ekbote Sir, Secretary Prof. Shamkant Deshmukh Sir, Joint Secretary Prof. Dr. Mrs. Jyotsna G. Ekbote Madam and retired Principal of Modern College, Shivajinagar, Pune-5, Dr. Rajendra S. Zunjarrao, welcomed the new Principal Prof. Dr. Nivedita G. Ekbote Madam. All the teaching and non-teaching staff congratulated her taking over as the new Principal of the college.

# Joining of and Charge Handover Ceremony to Prof. Dr. Nivedita Gajanan Ekbote as the New Principal of Modern College, Shivajinagar, Pune-5













# Joining of and Charge Handover Ceremony to Prof. Dr. Nivedita Gajanan Ekbote as the New Principal of Modern College, Shivajinagar, Pune-5












# Joining of and Charge Handover Ceremony to Prof. Dr. Nivedita Gajanan Ekbote as the New Principal of Modern College, Shivajinagar, Pune-5

**नवराष्ट्र**

www.navarashtra.com

## डॉ. निवेदिता एकबोटे प्राचार्यपदी

**पुणे,** शहर प्रतिनिधी. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे यांची निवड झाली आहे. यानिमित्त आयोजित कार्यक्रमाला संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे, सचिव प्रा. शामकांत देशमुख, सहसचिव प्रा. डॉ. ज्योत्स्ना एकबोटे आदी मान्यवर उपस्थित होते. गजानन एकबोटे म्हणाले, प्राचार्यपद ही शासनाची सुपर क्लास वन पोस्ट असून विद्यार्थ्यांसाठी नवनवीन उपक्रम राबविण्याची संधी यातून मिळते. या संधीचे सोनं झाले पाहिजे. निवेदिता



एकबोटे म्हणाल्या, सर्वांना सोबत घेऊन संघभावनेतून काम करणे हे माझे ध्येय आहे. 'मॉडर्न' या नावाला समाजात अधिक उंचावण्याचा प्रयत्न करेन. शामकांत देशमुख यांनी सांगितले की, "प्राचार्यपदी सक्षम व योग्य व्यक्तीची निवड झाली असून, त्यांचा अनुभव महाविद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी उपयुक्त ठरेल. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. वैजयंती जाधव तर आभार प्रदर्शन उपप्राचार्य डॉ. अंजली सरदेसाई यांनी मानले.

Pune Plus Edition

Sep 03, 2025 Page No. 6

Powered by: Navarashtra.com

**प्रभात**

## डॉ. निवेदिता एकबोटे मॉडर्न महाविद्यालयाच्या नव्या प्राचार्य

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २ -** प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या शिवाजीनगर येथील मॉडर्न कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी डॉ. निवेदिता एकबोटे यांची नियुक्ती झाली आहे. निवृत्त प्राचार्य डॉ. आर. एस. झुंजारराव यांच्याकडून त्यांनी मंगळवारी पदभार स्वीकारला. यामुळे डॉ. निवेदिता एकबोटे महाविद्यालयाच्या पहिल्या महिला प्राचार्य ठरल्या आहेत.

यानिमित्ताने संस्थेतील



**शिवाजीनगर : डॉ. निवेदिता एकबोटे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी (डावीकडून) डॉ. आर. एस. झुंजारराव, डॉ. गजानन एकबोटे, डॉ. ज्योत्स्ना एकबोटे व प्रा. शामकांत देशमुख उपस्थित होते.**

कार्यक्रमात डॉ. एकबोटे यांनी प्राचार्यपदाची सूत्रे स्वीकारली. यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, सचिव प्रा. शामकांत देशमुख, सहसचिव डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, माजी प्राचार्य डॉ. आर. एस. झुंजारराव आणि कुलसचिव प्रा. गणेश साठे आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. निवेदिता एकबोटे म्हणाल्या, संस्थेने दूरदृष्टीने दिलेली ही मोठी जबाबदारी आहे. काळानुसार महाविद्यालयात काही आवश्यक बदल करत कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) विभाग सुरू करण्याचा मानस आहे.

डॉ. गजानन एकबोटे म्हणाले, डॉ. झुंजारराव यांनी महाविद्यालयाची पायाभरणी केली. आता पहिल्या महिला प्राचार्य म्हणून डॉ. निवेदिता यांच्या कार्याकडे सर्वांचे लक्ष असेल. त्यांचा पहिल्या महिला प्राचार्यापासून ते भविष्यातील पहिल्या महिला कुलगुरूंपर्यंतचा प्रवास यशस्वी असेल, असा मला विश्वास आहे. माजी प्राचार्य डॉ. झुंजारराव म्हणाले, महाविद्यालयाने सामाजिक बांधिलकी जपत गरजू, गरीब विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडवण्यावर लक्ष केंद्रित करावे. प्रास्ताविक प्रा. शामकांत देशमुख यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. वैजयंती जाधव यांनी केले, तर उपप्राचार्य डॉ. अंजली सरदेसाई यांनी आभार मानले

Pune City Edition

Sep 03, 2025 Page No. 5

Powered by: erelego.com

# Joining of and Charge Handover Ceremony to Prof. Dr. Nivedita Gajanan Ekbote as the New Principal of Modern College, Shivajinagar, Pune-5

लोकमत

# क्विक Update

## 'मॉडर्न'च्या प्राचार्यपदी डॉ. निवेदिता एकबोटे

**पुणे :** प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या शिवाजीनगर येथील मॉडर्न महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी डॉ. निवेदिता एकबोटे यांची निवड करण्यात आली आहे. याबद्दल संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, सचिव प्रा. श्यामकांत देशमुख, सहसचिव डॉ. ज्योत्स्ना एकबोटे यांच्या उपस्थितीत त्यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन डॉ. वैजयंती जाधव यांनी केले, तर उपप्राचार्य डॉ. अंजली सरदेसाई यांनी आभार मानले. डॉ. निवेदिता एकबोटे म्हणाल्या की, सर्वांना सोबत घेऊन संघभावनेतून काम करणे करेन.

Hello Pune
Page No. 6 Sep 03, 2025
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

## 'मॉडर्न'च्या प्राचार्यपदी डॉ. निवेदिता एकबोटे

**पुणे :** प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर येथील प्राचार्यपदी प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे, सचिव प्रा. शामकांत देशमुख, सहसचिव प्रा. डॉ. ज्योत्स्ना एकबोटे उपस्थित होते.



डॉ. गजानन एकबोटे म्हणाले, प्राचार्यपदाची जबाबदारी ही शासनाची सुपर क्लास वन पोस्ट असून अत्यंत महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांसाठी नवनवीन व उपयुक्त उपक्रम राबविण्याची ही एक मोठी संधी आहे. या संधीचे सोनं झाले पाहिजे.

Pune Edition
Sep 03, 2025 Page No. 1
Powered by: erelego.com

# Joining of and Charge Handover Ceremony to Prof. Dr. Nivedita Gajanan Ekbote as the New Principal of Modern College, Shivajinagar, Pune-5

नवभारत

www.navbharatlive.com

## मॉडर्न कॉलेज की प्राचार्य बनीं प्रो. निवेदिता एकबोटे

■ पुणे, (सं.) प्रोग्रेसिव एजुकेशन सोसायटी के मॉडर्न कॉलेज की नई प्राचार्य के रूप में प्रो. डॉ.



निवेदिता एकबोटे का चयन किया गया है. इस अवसर पर आयोजित एक कार्यक्रम में संस्था के कार्यकारी अध्यक्ष प्रो. डॉ. गजानन एकबोटे, सचिव प्रो. श्यामकांत देशमुख और सह-सचिव प्रो. डॉ. ज्योत्स्ना एकबोटे जैसे प्रमुख व्यक्ति उपस्थित थे. गजानन एकबोटे ने कहा कि प्राचार्य का पद सरकार की 'सुपर क्लास वन' पोस्ट है और यह छात्रों के लिए नए-नए कार्यक्रम लागू करने का अवसर प्रदान करता है.

Pune plus Edition

Sep 06, 2025 Page No. 2

Powered by: navbharatlive.com

# Felicitation of Principal Prof. Dr. Nivedita G. Ekbote by the retired teaching faculty members of Modern College, Pune-5

आज आपल्या महाविद्यालयीन माजी प्राध्यापकांनी प्राचार्या डॉ. निवेदिता एकबोटे यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. पुनःश्च आम्हा सर्वांतर्फे हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा.

Dt. 13.9.2025






# एनआयआरएफ विषयी चर्चासत्र २४.९.२०२५



# एनआयआरएफ विषयी चर्चासत्र २४.९.२०२५

एनआयआरएफ रँकिंगवर मॉडर्न महाविद्यालयामध्ये चर्चासत्र संपन्न
२४ : पुणे
नॅशनल इन्स्टिट्यूशनल रैंकिंग फ्रेमवर्क अर्थात एनआयआरएफ रैंकिंग मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची मोठी घसरण झाली. याबाबत चिंतन करण्यासाठी पुण्यातील प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या शिवाजीनगर येथील लता मंगेशकर सभागृहात शिक्षण क्षेत्रातील अभ्यासू व्यक्तींची बैठक संपन्न झाली. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. NIRF रँकिंग ही सामूहिक जबाबदारी असून ती एकट्या विद्यापीठाची जबाबदारी नाही असे आपल्या भाषणात ते म्हणाले. उच्च शिक्षणात नवनवीन प्रवाह आले आहेत. त्या सर्वांना अंगीकारणे आवश्यक आहे मत त्यांनी मांडले.
यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितिन करमाळकर उपस्थित होते.
एनआयआरएफ रैंकिंग मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ९१ क्रमांकापर्यंत खाली घसरले. या उलट सर्व खाजगी विद्यापीठे रँकिंग मध्ये वर आली. विद्यापीठाची रैंकिंग मध्ये झालेली मोठी घसरण ही चिंतेची बाब आहे. २०१४ सुमारास nirf रँकिंग ला सुरुवात झाली.ही रँकिंग विद्यापीठापुरते मर्यादित असल्याचे त्यांनी सांगितले.विद्यापीठामध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्राध्यापकांना आमंत्रित करणे, अभ्यासक्रम कालबाह्य न ठेवता त्यामध्ये सतत नवीन बदल करणे, त्याचप्रमाणे NIRF रँकिंग साठी डेटा भरला आहे तो अत्यंत काळजीपूर्वक भरणे आवश्यक असल्याचे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि एनएपी इम्प्लिमेंटेशन कमिटीचे अध्यक्ष डॉ. नितीन करमळकर यांनी व्यक्त केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सर्व स्तरांमध्ये प्रगती होण्यासंदर्भात चर्चा करण्यासाठी तसेच यावर उपाययोजना सुचवण्यासाठी ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञ तसेच विद्यापीठातील विविध अधिकार, मंडळावर काम करणारे आजी माजी आधिसभा सदस्य, विद्या परिषद सदस्य, त्याचप्रमाणे व्यवस्थापन परिषदेचे सदस्य या बैठकीसाठी उपस्थित होते .यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी प्र कुलगुरू डॉ.एन.एस.उमराणी सर उपस्थित होते. संस्थात्मक पातळीवर विकास करणे, इनटेक आणि एनरोलमेंट यांमध्ये जर तफावत असेल तर रँकिंग वर त्याचा परिणाम होतो, त्यामुळे त्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.यामधील पॅरामीटरकडे लक्ष देणे आवश्यक आहे असे ते म्हणाले.यावेळी मॉडर्न फार्मसी महाविद्यालयाचे निगडीचे प्राचार्य डॉ. पी.डी. चौधरी यांनी NIRF रँकिंग च्या अनुषंगाने सादरीकरण केले.यावेळी विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग डॉ.अशोक उबाळे, प्राध्यापक संघटनेचे एस.पी.लवांदे सर, राजेश पांडे उपस्थीत होते.
प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे सहकार्यवाह प्रा.डॉ.सौ.ज्योत्स्ना एकबोटे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्यवाह प्रा.शामकांत देशमुख यांनी केले. यावेळी अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाचे डी.बी.पवार यांनी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यापीठाचे रँकिंग वाढविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजे आहे मत श्री.राजेश पांडे यांनी व्यक्त केले. प्रा.एस.पी.लवांदे यांनी विद्यापीठातील डीन सारख्या महत्वाच्या पदावर कायमस्वरूपी नियुक्त्या करणे आवश्यक असल्याचे मत यावेळी व्यक्त केले. यावेळी मा. सुधाकर जाधवर यांनी NIRF दृष्टीने प्रशिक्षण देण्यात यावे अशी सूचना व्यक्त केली. डॉ. ए.पी. कुलकर्णी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. श्री. कृष्णकुमार गोयल यांनी सुद्धा या रँकिंग वाढण्याच्या दृष्टीने उपाययोजना आवश्यक असल्याचे त्यांनी सुचवले.कार्यक्रमाचे आभार अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.कल्याणी जोशी यांनी मानले. सौ.स्वाती पटवर्धन यांनी ईशस्तवन सादर केले.

# एनआयआरएफ विषयी चर्चासत्र २४.९.२०२५








# एनआयआरएफ विषयी चर्चासत्र २४.९.२०२५














# एनआयआरएफ विषयी चर्चासत्र २४.९.२०२५














# एनआयआरएफ विषयी चर्चासत्र २४.९.२०२५















# एनआयआरएफ विषयी चर्चासत्र २४.९.२०२५

## विद्यापीठाच्या घसरलेल्या एनआयआरएफ रँकिंगवर चिंतन; उपाय योजनांवर चर्चा

**पुणे** : नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क अर्थात एनआयआरएफ रँकिंग मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची मोठी घसरण झाली. त्यावर विविध क्षेत्रातून टीका करण्यात आली. याबाबत चिंतन करण्यासाठी पुण्यातील प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या शिवाजीनगर येथील लता मंगेशकर सभागृहात आज (बुधवारी) दुपारी ४ वाजता शिक्षण क्षेत्रातील अभ्यासू व्यक्तींची बैठक आयोजित करण्यात आली आहे. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ.गजानन एकबोटे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पाडणार आहे.

एनआयआरएफ रँकिंग मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ९१ क्रमांकापर्यंत खाली घसरले. या उलट सर्व खाजगी विद्यापीठे रँकिंग मध्ये वर आली. विद्यापीठाची रँकिंग मध्ये झालेली मोठी घसरण ही चिंतेची बाब आहे. त्यामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सर्व स्तरांमध्ये प्रगती होण्यासंदर्भात चर्चा करण्यासाठी तसेच यावर उपाययोजना सुचवण्यासाठी ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञ तसेच विद्यापीठातील विविध अधिकार मंडळावर काम करणारे आजी-माजी आधिसभा सदस्य ,विद्या परिषद सदस्य, त्याचप्रमाणे व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांना या बैठकीसाठी बोलविण्यात आले आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि एनएपी इम्प्लिमेंटेशन कमिटीचे अध्यक्ष डॉ. नितीन करमळकर, राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ.शैलेंद्र देवळाणकर यांच्यासह शिक्षणाक्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींना या बैठकीसाठी निमंत्रण पाठविण्यात आले आहे, असे प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

Kesari 24.9.2025

# एनआयआरएफ विषयी चर्चासत्र २४.९.२०२५

## एनआयआरएफ गुणवत्ता श्रेणीवर चर्चासत्र



**पुणे** : नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क अर्थात एनआयआरएफ गुणवत्ता श्रेणी मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची मोठी घसरण झाली. याबाबत चिंतन करण्यासाठी पुण्यातील प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या सभागृहात शिक्षण क्षेत्रातील तज्ञांची बैठक बुधवारी पार पडली. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. एनआयआरएफ गुणवत्ता श्रेणी ही सामूहिक जबाबदारी असून ती एकट्या विद्यापीठाची जबाबदारी नाही असे आपल्या भाषणात ते म्हणाले. उच्च शिक्षणात् नवनवीन प्रवाह आले आहेत. त्या सर्वांना अंगीकारणे आवश्यक आहे मत त्यांनी मांडले.

यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितिन करमाळकर उपस्थित होते.

एनआयआरएफ गुणवत्ता श्रेणी मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ९१ क्रमांकापर्यंत खाली घसरले. या उलट सर्व खाजगी विद्यापीठे श्रेणी मध्ये वर आली. विद्यापीठाची श्रेणी मध्ये झालेली मोठी घसरण ही चिंतेची बाब आहे. २०१४ सुमारास एनआयआरएफ गुणवत्ता श्रेणीला सुरुवात झाली. ही श्रेणी विद्यापीठापुरते मर्यादित असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यापीठामध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्राध्यापकांना आमंत्रित करणे, अभ्यासक्रम कालबाह्य न ठेवता त्यामध्ये सतत नवीन बदल करणे, त्याचप्रमाणे एनआयआरएफ गुणवत्ता श्रेणी साठी डेटा भरला आहे तो अत्यंत काळजीपूर्वक भरणे आवश्यक असल्याचे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि एनएपी इम्प्लिमेंटेशन कमिटीचे अध्यक्ष डॉ. नितीन करमळकर यांनी व्यक्त केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सर्व स्तरांमध्ये प्रगती होण्यासंदर्भात चर्चा करण्यासाठी तसेच यावर उपाययोजना सुचवण्यासाठी ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञ तसेच विद्यापीठातील विविध अधिकार, मंडळावर काम करणारे आजी माजी आधिसभा सदस्य, विद्या परिषद सदस्य, त्याचप्रमाणे व्यवस्थापन परिषदेचे सदस्य या बैठकीसाठी उपस्थित होते. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. एन.एस.उमराणी उपस्थित होते. यावेळी विभागीय सहसंचालक ,उच्च शिक्षण विभाग डॉ.अशोक उबाळे, प्राध्यापक संघटनेचे एस.पी.लवांदे,राजेश पांडे उपस्थीत होते.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे सहकार्यवाह डॉ. ज्योत्स्ना एकबोटे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.शामकांत देशमुख यांनी केले. यावेळी अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाचे डी.बी.पवार यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी सुधाकर जाधवर, ए.पी. कुलकर्णी, कृष्णकुमार गोयल यांनीही आपले मनोगते व्यक्त केली.

Kesari 25.9.2025

# एनआयआरएफ विषयी चर्चासत्र २४.९.२०२५

**मटा अँकर** **प्राध्यापकांच्या रिक्त जागांचाही फटका : डॉ. नितीन करमळकर**

## वाङ्मयचौर्याचा विद्यापीठावर नकारात्मक परिणाम

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे ५०० 'रिसर्च पेपर' वाङ्मयचौर्यामुळे एका नामांकित जर्नलमधून मागे घेण्यात आले. त्यामध्ये ४९५ संलग्न कॉलेजांचे, तर पाच विद्यापीठाच्या विभागांमधील होते. याचा फटका विद्यापीठाला 'एनआयआरएफ' रँकिंगला बसला असून, विद्यापीठाचा क्रमांक राष्ट्रीय स्तरावर घसरला आहे,' अशी माहिती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी बुधवारी दिली.



### कोणत्या उपाययोजना आवश्यक?

- कालबाह्य अभ्यासक्रम बंद करून, उद्योगांना पूरक अभ्यासक्रम सुरू करावेत.
- दर्जेदार आणि समाजाभिमुख संशोधन, स्टार्टअप भर द्यावा.
- हॅकेथॉन, पेटंट, इंडस्ट्री-ॲकॅडेमिया या बाबींवर भर द्यावा.
- प्राध्यापक, संशोधकांनी निधीसाठी 'एएनआरएफ', 'प्राइम मिनिस्टर प्रोफेसरशिप'चा उपयोग करावा
- विद्यापीठाने आयक्युएसी अंतर्गत समिती स्थापून, सर्व घटकांमध्ये सुसंवाद राखावा

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी आणि अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाच्या वतीने पुणे विद्यापीठाच्या घसरलेल्या रँकिंगबाबत चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी डॉ. करमळकर बोलत होते. माजी प्र. कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, सोसाटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकोबोटे, मॅनेजमेंट कौन्सिल सदस्य डॉ. डी. बी. पवार, डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, सोसायटीचे कार्यवाह डॉ. श्यामकांत देशमुख. डॉ. एस. पी. लवांडे आदी उपस्थित होते.

Maharashtra Times 25.9.2025

# एनआयआरएफ विषयी चर्चासत्र २४.९.२०२५

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

## कमी शिक्षक, विदा कमतरतेमुळे विद्यापीठाची क्रमवारीत घसरण

### माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांचे मत

**पुणे :** राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी आराखड्यात (एनआयआरएफ) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची घसरण होण्यात शिक्षकांची कमी झालेली संख्या, संशोधनातील प्रामाणिकतेचा अभाव, कालबाह्य अभ्यासक्रम, आंतरराष्ट्रीय शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा अभाव, विदा व्यवस्थापनातील कमतरता अशी कारणे आहेत, असे मत माजी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी मांडले. तसेच एका आंतरराष्ट्रीय संशोधनपत्रिकेने अलीकडे विद्यापीठाशी संबंधित सुमारे ५०० शोधनिबंध मागे घेतले. त्यापैकी सुमारे ४९५ शोधनिबंध संलग्न महाविद्यालयांतील असले, तरी त्यात विद्यापीठाचे नाव दिसत होते, असेही त्यांनी सांगितले.

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने नुकत्याच जाहीर केलेल्या एनआयआरएफ क्रमवारीत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची सर्वसाधारण क्रमवारीमध्ये ९१व्या स्थानी घसरण झाली. या पार्श्वभूमीवर प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीतर्फे आयोजित विचारमंथन कार्यक्रमात डॉ. करमळकर बोलत होते.

क्रमवारीतील घसरणीची कारणमीमांसा करताना डॉ. करमळकर म्हणाले, एखाद्या अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता वीस असताना दोन विद्यार्थीही प्रवेश घेत नसल्यास त्या अभ्यासक्रमाला बाजारात मागणी नाही, तो कालबाह्य झाला आहे. अशा वेळी बारकाईने अभ्यास करून असे अभ्यासक्रम बंद करणे शक्य आहे का, हे तपासले पाहिजे. अभ्यासक्रम बंद करणे सोपे असले, तरी संबंधित प्राध्यापकांच्या उपजीविकेचा प्रश्नही निर्माण होतो. त्यामुळे पर्यायी उपायांचा विचार केला पाहिजे.

25/09/2025 | Pune | Page : 22
Source : https://epaper.loksatta.com

# एनआयआरएफ विषयी चर्चासत्र २४.९.२०२५

प्रभात



**पुणे :** प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे यांनी एनआयआरएफ रँकिंगविषयावरील आयोजित चर्चासत्रात मार्गदर्शन केले.

## विद्यापीठाच्या घसरणीवर चिंतन गरजेचे

### एनआयआरएफ रँकिंगमधील घसरणीवर मान्यवरांनी मांडली मते

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २४** - नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क (एनआयआरएफ) मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या झालेल्या घसरणीवर दोषारोप करण्याऐवजी आत्मचिंतन करुन सुधारणा करण्याची गरज असल्याचे मत पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. डॉ. नितीन करमळकर यांनी व्यक्त केले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी आणि विद्यापीठातील अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाने एनआयआरएफ रँकिंग घसरणीवर शिवाजीनगर येथील स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर सभागृहात आयोजित चर्चासत्रात ते बोलत होते.

| VASEKAR, VISHWAS | LOLAK |
| VASEKAR, VISHWAS | MRITYO NAKO YEU KI |
| VASEKAR, VISHWAS | VISHWAVASUCHI NIRUPANE: NAVE LALIT GAYA |
| VASEKAR, VISHWAS | KAVYASVA |
| VASEKAR, VISHWAS | MULYATRAYICHI KAVITA |
| VASEKAR, VISHWAS | SHATKATIL ORKHADE (RAMESH CHILLE YANCHYA KAVITECHI SAMIKSHA) |
| VASEKAR, VISHWAS / MALGHE, SAMBHAJI | KESHARMATI: KAVITA AANI SAMIKSHA |
| VASEKAR, VISHWAS | KOSH: SAMANARTHI VA VIRUDDHARTI SHABDANCHA |
| VASEKAR, VISHWAS | MARATHWADYACHE SAHITYA |
| VASEKAR, VISHWAS | PORTRAIT POEMS |
| VASEKAR, VISHWAS | KALAMI KAVITA |
| VASEKAR, VISHWAS | ANAVAT |
| VASEKAR, VISHWAS | RUTU BARVA |
| MALGHE, SAMBHAJI | ACHARYA DARSHAN: VISHWAS VASEKARANCHE GURUVISHAYAK LALIT GADYA |
| VASEKAR, VISHWAS | BAWANNAKASHEE: VACHAN YATRECHA NAVNEET |
| VASEKAR, VISHWAS | GAALAATLYA GAALAAT |
| VASEKAR, VISHWAS | JIVHALGHARTI |
| VASEKAR, VISHWAS | SHAKUNPATRE |
| VASEKAR, VISHWAS | BAL SAHITYACHE ANTRANG |
| VASEKAR, VISHWAS | PUPAJINCHI PATRE (PURUSHOTTAM PATIL YANNI DIGESH JOSHI YANCHYASHI KELELA PATRAVYAVAHAR) |
| VASEKAR, VISHWAS | WOH JISKI ZUBAN URDU KI TARAH |

# News Paper Clippings : September 2025




Online newspapers and online services based on newspapers are becoming increasingly popular and useful in current digital age. These services helped libraries in reaching out users wherever they are and also save time of the users. The newspaper clippings are also known as press clippings in some libraries .

[*Ref: Gaur, Ramesh C., Chand, Mahesh, Gaur, Kavita & Yadav, Amar Singh. (2013). Online Newspaper Clippings and News Services for Libraries: Experiences in Indian Libraries. Accessed from* *http://library.ifla.org/240/1/153-gaur-en.pdf* ]

**Clipping** is the cutting-out of articles from a paper publication. Newspaper clippings are often used when people have to write a report or make a presentation or for future reference.

The Modern College, Shivajinagar Library subscribes to Ten (10) English Newspapers and Eleven (11) Marathi Newspapers which are referred by the students and staff. The Library has a practice of posting notifications of important news related to Education, UGC, NAAC, Savitribai Phule Pune University on the WhatsApp Groups of Staff.

Father of Library Science, Dr. S.R.Ranganathan's Fifth Law of Library Science states that *'Library is a Growing Organism'*. It means that a library should be a continually changing institution, never static in its outlook. Books, methods, and the physical library should be updated over time. As an implication of the Fifth Law of Library Science, the Modern College Library has also updated the ways of keeping and maintaining the Newspaper Clippings. E-newspaper Clippings Service gives a global viewership/user base, no maintenance required, storage space issues will be solved and any user, anytime, at any place can have an access to the Newspaper Clippings Service. The E-Newspaper Clippings Section is divided into ***News regarding MCASC, Pune-5, Education, Work of Appreciation, Health, Research, Sports, Miscellaneous*** **.**



## *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

नवराष्ट्र
www.navarashtra.com

### डॉ. एन. एस. उमराणी यांचे मॉडर्न कॉलेजमधील व्याख्यानात प्रतिपादन

# शिक्षकाची भुमिकाही पालकांची

पुणे, शहर प्रतिनिधी. विद्यार्थ्यांच्या मनात प्रेम, जिज्ञासा, कौतुक,आदर निर्माण करायचा असेल तर विषयावर प्रभुत्व आवश्यक आहे. शिक्षकाची भुमिका ही आई वडीलां प्रमाणेच असते. मुलांच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण करण्यासाठी शिक्षक कार्यरत असतात. असे डॉ.एन.एस.उमराणी यांनी प्रतिपादन केले. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मॉडर्न हायस्कूल, येथे शिक्षक दिननिमित्त ते बोलत होते. यावेळी प्रा. डॉ. गजानन एकबोटे, कार्यवाह प्रा. शामकांत देशमुख, डॉ.एन.एस.उमराणी, पुणे म.न.पा. नगरसेविका व सहकार्यवाह प्रा. डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, नियामक मंडळ सदस्या, उपकार्यवाह व प्राचार्या डॉ. निवेदिता एकबोटे यांनी केले.

### दादाभाऊ शिनलकर यांचा पुरस्काराने सन्मान

यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे अधिसभा सदस्य दादाभाऊ शिनलकर यांना पालकसंघाचा आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन विशेष सन्मान करण्यात आला. शामकांत देशमुख म्हणाले, आम्ही मराठी माध्यमाच्या शाळेत शिकलो. भाषा शिक्षणात अडसर ठरत नाही. मॉडर्न हायस्कूलची निवड म्हणजे पालकांनी एका उत्तम शाळेची निवड केली आहे. शिक्षकांना मी आवाहन करतो की तुम्ही जेंव्हा तंत्रज्ञानाचा वापर करता,तेंव्हा तुम्ही नियोजन, सराव, सादरीकरण करावे. शिक्षकामध्ये क्षमता, स्वयंशिस्त, कटिबद्धता असली पाहिजे.




Pune Plus Edition
Sep 10, 2025 Page No. 3
Powered by: Navarashtra.com

## *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

# मॉडर्न हायस्कूलमध्ये शिक्षक दिन समारंभ उत्साहात संपन्न

• पुणे •

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मॉडर्न हायस्कूल, शिवाजीनगर येथे शिक्षक दिन समारंभ उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात ईशस्तवनाने झाली. स्वागत व प्रास्ताविक मा. सौ. सीमा कुलधरण यांनी केले. मान्यवरांचा परिचय व सत्कार मा. सौ. वंदना सोनोनेंनी केला.

प्रसंगी बोलताना डॉ.एन.एस.उमराणी म्हणाले की,शिक्षक दिन सर्वार्थाने अतिशय महत्वाचा आहे. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच स्मरण करण्यासाठी हा दिवस.ऐतिहासिक,सांस्कृतिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वपूर्ण अशा मॉडर्न हायस्कूल मध्ये मी आज आलो आहे. अशा कार्यक्रमातूनच विद्यार्थ्यांचे समुपदेशन होत असते. ज्यांच्यामुळे आपण घडलो त्यांचे स्मरण करणे



आवश्यक आहे. जसे शाळेत शिक्षक असतात तसेच समाजातही काही समाज शिक्षक असतात. त्यांच्यामुळेही आपले व्यक्तिमत्त्व घडत असते .ज्या शाळेने प्रा डॉ.गजानन एकबोटे सरांसारखे व्यक्तिमत्त्व घडवले, ती शाळा किती गौरवशाली असेल. शिक्षकांचे आपल्या विषयावर प्रभुत्व पाहिजे. विद्यार्थ्यांच्या मनात प्रेम, जिज्ञासा, कौतुक,आदर निर्माण करायचा असेल तर विषयावर प्रभुत्व आवश्यक आहे. शिक्षकाची भुमिका ही आई वडीलां प्रमाणेच असते. मुलांच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण करण्यासाठी शिक्षक कार्यरत असतात. भोवतालच्या परिस्थितीनुसार शाळेने कालानुरूप बदल केला,त्यामुळेच आज शाळेत विद्यार्थीसंख्या टिकून आहे.शिकविणे म्हणजे जीवन कौशल्ये प्रदान करणे. जी जीवनकौशल्ये या शाळेत अध्यापनातून संक्रमित केली जातात. कार्यवाह प्रा शामकांत देशमुख म्हणाले की आपले कार्याध्यक्ष प्रा.डॉ.गजानन एकबोटे,आजचे प्रमुख पाहुणे डॉ एन .एस उमराणी,मी स्वता: पण मराठी माध्यमाच्या शाळेत शिकलो.भाषा शिक्षणात अडसर ठरत नाही.मॉडर्न हायस्कूलची निवड म्हणजे पालकांनी एका उत्तम शाळेची निवड केली आहे. शिक्षकांना मी आवाहन करतो की तुम्ही जेंव्हा तंत्रज्ञानाचा वापर करता,तेंव्हा तुम्ही नियोजन, सराव,सादरीकरण करावे.शिक्षकामध्ये क्षमता, स्वयंशिस्त, कटिबद्धता असली पाहिजे. प्रा.डॉ.गजानन एकबोटे म्हणाले की, शिक्षकांचे माझ्या जीवनातील स्थान अनन्यसाधारण असे आहे. माझ्या शिक्षकांना दिलेल्या वचनानुसार मी शिक्षण क्षेत्रासाठी आयुष्य समर्पित केले.माझ्या जडणघडणीत माझे आई वडील माझी शाळा,माझे शिक्षक यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. कार्यक्रमाला मा. डॉ. एन. एस. उमराणी (माजी प्राचार्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) यांनी प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन केले. अध्याक्षीय भाषणात प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे (कार्याध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी) यांनी शिक्षक दिनाचे महत्व स्पष्ट करून शिक्षकांच्या कार्याचा गौरव केला.

यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे अधिसभा सदस्य दादाभाऊ शिनलकर यांना पालकसंघाचा आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. सतीश लिंबेकर यांनी केले. आभारप्रदर्शन सौ. सुमिता पाटील यांनी व्यक्त केले. या उपक्रमाचे कौतुक कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे, कार्यवाह प्रा. शामकांत देशमुख, पुणे म.न.पा. नगरसेविका व सहकार्यवाह प्रा. डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, नियामक मंडळ सदस्या, उपकार्यवाह व प्राचार्या डॉ. निवेदिता एकबोटे यांनी केले. कार्यक्रम अत्यंत उत्साहात व आनंदी वातावरणात पार पडला.

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

लोकमत

# 'साहित्य' समाजाला सकारात्मक दिशेने घेऊन जाणारे हत्यार : डॉ. गोसावी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे:** 'साहित्य' हे केवळ काल्पनिक विषयांवर आधारलेले नसून, साहित्य हा समाजाचा आरसा आहे. 'साहित्य' समाजाला सकारात्मक दिशेने घेऊन जाणारे हत्यार आहे. साहित्य जीवनाला दिशा देणारे आणि समाजाला प्रश्न विचारणारे माध्यम आहे. माणुसकी हरवली तर प्रगती हरवते, त्यामुळे याचा गांभीर्याने विचार व्हायला हवा, असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी व्यक्त केले.



प्रियदर्शनी ग्रुप ऑफ स्कूल्स, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा मराठी व हिंदी विभाग, महाराष्ट्र साहित्य परिषद आणि भारत नवनिर्माण समिती यांच्या वतीने आयोजित 'बनारस लिट फेस्टिवल' चे उद्घाटन नुकतेच झाले.

प्रियदर्शनी ग्रुप ऑफ स्कूल्स, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा मराठी व हिंदी विभाग, महाराष्ट्र साहित्य परिषद आणि भारत नवनिर्माण समिती यांच्या वतीने आयोजित 'बनारस लिट फेस्टिवल'च्या उद्घाटन प्रसंगी डॉ. गोसावी बोलत होते. विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. विजय खरे, प्रियदर्शनी ग्रुप ऑफ स्कूलचे विश्वस्त डॉ. राजेंद्र सिंह, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष डॉ. मिलिंद जोशी, सुनीताराजे पवार, मराठी विभागाचे प्रमुख तुकाराम रोंगटे, हिंदी विभागाचे प्रमुख डॉ. सदानंद भोसले, मॉडर्न महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. निवेदिता एकबोटे, ब्रिजेश सिंह, प्रसिद्ध कवी मदन मोहन दानिश, नरेंद्र सिंह, बी. के. सिंह आदी उपस्थित होते. कार्यक्रमात डॉ. विजय खरे, सुनीताराजे पवार, मदन मोहन दानिश, डॉ. निवेदिता एकबोटे यांनी मनोगत व्यक्त केले.

डॉ. राजेंद्र सिंह यांनी बनारस लीट फेस्टिवल कार्यक्रम आयोजनाची भूमिका मांडली. ब्रिजेश सिंह यांनी प्रास्ताविक केले. सदानंद भोसले यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

Hello Pune
Page No. 6 Sep 17, 2025
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

प्रभात



**पुणे : प्रियदर्शनी ग्रुप ऑफ स्कूल्सच्या वतीने आयोजित बनारस लिट फेस्टिव्हलचे उद्‌घाटन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते झाले.**

## साहित्य हे समाजाला सकारात्मक दिशेने घेऊन जाते

### कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी; बनारस लिट फेस्टिव्हलचे उद्‌घाटन

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १६ -** साहित्य हे केवळ काल्पनिक विषयांवर आधारलेले नसून साहित्य हा समाजाचा आरसा आहे, तसेच समाजाला सकारात्मक दिशेने घेऊन जाते. साहित्य जीवनाला दिशा देणारे माध्यम आहे, असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी व्यक्त केले.

प्रियदर्शनी ग्रुप ऑफ स्कूल्स, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा मराठी व हिंदी विभाग, महाराष्ट्र साहित्य परिषद आणि भारत नवनिर्माण समिती यांच्यातर्फे शिवाजीनगर येथील मॉडर्न कॉलेजमधील लता मंगेशकर सभागृहात आयोजित बनारस लिट फेस्टिव्हलच्या उद्‌घाटनप्रसंगी डॉ. सुरेश गोसावी बोलत होते.

डॉ. राजेंद्र सिंह यांनी बनारस लिट फेस्टिवलच्या आयोजनाची भूमिका मांडली. आपल्या देशाला फार मोठी संस्कृती असून या संस्कृतीतून आलेल्या साहित्याची जपवणूक करण्याची आवश्यकता आहे. साहित्याला वाचण्यासाठी आणि समजण्यासाठी पेशन्स लागतो, असे मत डॉ. राजेंद्र सिंह यांनी व्यक्त केले आहे.

या वेळी विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. विजय खरे, प्रियदर्शनी ग्रुप ऑफ स्कूलचे विश्वस्त डॉ. राजेंद्र सिंह, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष डॉ. मिलिंद जोशी, सुनीताराजे पवार, मराठी विभागप्रमुख तुकाराम रोंगटे, हिंदी विभागप्रमुख डॉ. सदानंद भोसले, मॉडर्न महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. निवेदिता एकबोटे, ब्रिजेश सिंह, कवी मदन मोहन दानिश, नरेंद्र सिंह, बी. के. सिंह आदी उपस्थित होते.

सध्या सामाजिक वातावरण तापले असून, त्यावर साहित्याची झुळूक फुंकर घालू शकते, असे मिलिंद जोशी यांनी स्पष्ट केले. डॉ. खरे, पवार, मदन मोहन दानिश, डॉ. निवेदिता एकबोटे यांनीही मनोगत व्यक्त केले. डॉ. सिंह यांनी कार्यक्रमाच्या आयोजनाची भूमिका मांडली. प्रास्ताविक ब्रिजेश सिंह यांनी केले. स्वागत सदानंद भोसले यांनी, तर नरेंद्र सिंह यांनी आभार मानले.

Pune City Edition
Sep 17, 2025 Page No. 15
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

# 'शाहिरी कला ही काळाची गरज'



**पुणे :** आजची तरुण पिढी काही करत नाही, अशी केवळ ओरड करण्यापेक्षा या तरुण पिढीला योग्य दिशा दाखविण्याची गरज आहे. शाहिरी ही केवळ कला नाही तर महाराष्ट्राची परंपरा आहे. ही परंपरा तरुणांच्या माध्यमातून पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे ही काळाची गरज आहे, असे मत आचार्य शाहीर हेमंतराजे मावळे यांनी व्यक्त केले.

शाहीर हिंगे लोककला प्रबोधिनी तर्फे शाहीर हिंगे युवा कलागौरव पुरस्कार युवाशाहीर अजिंक्य लिंगायत यांना कर्वे रस्त्यावरील स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृह येथे प्रदान करण्यात आला. यावेळी मॉडर्न महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. निवेदिता एकबोटे, अभिनेते तेजस बर्वे, प्रा. संगीता मावळे उपस्थित होते.

शाहीर हेमंतराजे मावळे म्हणाले, जोपर्यंत समाजामध्ये समस्या आहे, तोपर्यंत शाहिरी ही कला जिवंत राहणार आहे. आजही महाराष्ट्राच्याच नव्हे तर जगाच्या कानाकोपऱ्यात शाहिरीच्या माध्यमातून अनेक जण समस्या मांडत आहेत. शाहिरी कला विविध माध्यमातून तरुणांपर्यंत पोहोचविणे गरजेचे आहे. तरच खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचा गौरवशाली इतिहास तरुणांपर्यंत पोहोचू शकेल.

डॉ. निवेदिता एकबोटे म्हणाल्या, शाहिरी कला आत्मसात करणे ही मोठी जबाबदारी आहे. या कलेच्या माध्यमातून केवळ स्वतःच्या सुखासाठी कला सादर करणे महत्त्वाचे नाही, तर या कलेच्या माध्यमातून समाजामध्ये सकारात्मक बदल कशा प्रकारे करू शकतो याची जाणीव कलाकारांना असते. प्रा. संगीता मावळे यांनी प्रास्ताविक केले. नंदिनी देवकर यांनी सूत्रसंचालन केले व प्रिती खोसे यादव यांनी आभार मानले.

Kesari 23.9.2025

# News Paper Clippings During September 2025

## Section: Education

पुढारी

# नवीन अभ्यासक्रमांच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करा!

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने संलग्न महाविद्यालयांना यंदाच्या शैक्षणिक वर्षासाठी संशोधन संस्था, केंद्रामधील मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमांचे नूतनीकरण, स्थायी संलग्निकरण मान्यता व नैसर्गिक वाढीचे प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच प्रस्ताव सादर करण्यासाठी येत्या ३० सप्टेंबरपर्यंत मुदत दिली असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ११०, १११, ११४, ११५ व ११६ मधील तरतुदीनुसार संलग्न महाविद्यालये, परिसंस्था, संशोधन संस्था यांमधील अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ करिता संलग्निकरणाच्या, मान्यतेच्या नूतनीकरण, स्थायी संलग्निकरण, मान्यता, नैसर्गिक वाढ चालू ठेवणे, तसेच शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ करिता नवीन संशोधन केंद्र, संलग्नित महाविद्यालये,

- **विद्यापीठाकडून संलग्न महाविद्यालयांना ३० सप्टेंबरपर्यंत मुदत**

मान्यताप्राप्त परिसंस्थेतील नवीन संशोधन केंद्र, अस्तित्वात असलेल्या संशोधन केंद्रामध्ये नवीन विषय, अभ्यासक्रम सुरू करण्याबाबतचे प्रस्ताव विद्यापीठाच्या www. unipune. ac. in या संकेत स्थळावरील लिंकवरून काळजीपूर्वक भरून सक्षम अधिकाऱ्याच्या स्वाक्षरी व शिक्क्यानिशी शुल्कासह व आवश्यक त्या कागदपत्रांसह ३० सप्टेंबर २०२५ रोजी किंवा त्यापूर्वी कार्यालयीन वेळेत ऑनलाईन अपलोड करावेत. फक्त नवीन संशोधन केंद्रासाठी सादर केलेले प्रस्ताव ऑनलाईन अपलोड करून त्याची प्रत ३० सप्टेंबरला किंवा त्यापूर्वी कार्यालयीन वेळेत संबंधित विभागात जमा करावी, असेदेखील स्पष्ट करण्यात आले आहे.

Pune Edition
Sep 03, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During September 2025*

## *Section: Education*

लोकमत

# नवे केंद्र, अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी करा अर्ज

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये, परिसंस्था, संशोधन संस्था, केंद्रांनी शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ करिता नवीन संशोधन केंद्र किंवा अस्तित्वात असलेल्या संशोधन केंद्रामध्ये नवीन विषय/अभ्यासक्रम सुरू करण्याबाबतचे प्रस्ताव विद्यापीठाकडे सादर करणे आवश्यक आहे. सदर प्रस्ताव ३० सप्टेंबर रोजी किंवा त्यापूर्वी कार्यालयीन वेळेत ऑनलाइन अपलोड करावेत, असे परिपत्रक विद्यापीठाने काढले आहे.



सदर प्रस्ताव विद्यापीठाच्या www.unipune.ac.in या संकेतस्थळावरील BOD-BOD online-Colleges/Institutes - Affiliation या लिंकवरून काळजीपूर्वक भरून सक्षम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरी व शिक्क्यासह विहित शुल्क व आवश्यक कागदपत्रांसह सादर करणे आवश्यक आहे.

फक्त नवीन संशोधन केंद्रासाठी सादर केलेले अर्ज/प्रस्ताव ऑनलाइन अपलोड करून त्याची प्रत दि. ३० सप्टेंबर रोजी किंवा त्यापूर्वी कार्यालयीन वेळेत प्रस्तुत विभागात जमा करावी, असेही नमूद केले आहे. उपकुलसचिव सुनीता हजारे यांच्या सहीने हे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहे.

Pune Main
Page No. 9 Sep 03, 2025
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During September 2025*

## *Section: Education*

पुढारी

# अकरावी प्रवेशासाठी पुन्हा एक विशेष फेरी

- ८ सप्टेंबरला होणार प्रवेश जाहीर
- प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना ८ आणि ९ सप्टेंबरला संधी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतून अद्याप महाविद्यालय न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी आता प्रवेशासाठी आणखी विशेष फेरी राबवली जाणार आहे. ३ ते ९ सप्टेंबरदरम्यान संबंधित फेरी राबविण्यात येणार आहे. राज्यात अकरावी प्रवेशासाठी आत्तापर्यंत तब्बल १३ लाखांवर विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून प्रवेशासाठी अद्यापही साडे आठ लाखांच्या जवळपास जागा रिक्तच राहिल्या असल्याचे स्पष्ट झाले आहे.

अकरावी प्रवेशासाठी राज्यात ९ हजार ५३५ महाविद्यालयांमध्ये १८ लाख १५ हजार १६५ जागा कॅप प्रवेशाच्या तसेच ३ लाख ४४ हजार ६७ जागा कोटा प्रवेशाच्या अशा एकूण २१ लाख ५९ हजार २३२ जागा उपलब्ध आहेत. त्यासाठी १४ लाख ७९ हजार ६५४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्यापैकी ११ लाख ४५ हजार ६३४ विद्यार्थ्यांनी कॅपमधून तर १ लाख ६७ हजार १४८ विद्यार्थ्यांनी कोटाअंतर्गत अशा १३ लाख १२ हजार ७८२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. आता प्रवेशासाठी अद्यापही ६ लाख ६९,५३१ जागा कॅप प्रवेशाच्या तसेच १ लाख ७६ हजार ९१९ जागा कोटा प्रवेशाच्या अशा एकूण ८ लाख ४६,४५० जागा प्रवेशासाठी उपलब्ध असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. अकरावी प्रवेशासाठी अनेक फेऱ्या राबवूनही विद्यार्थी प्रवेशाकडे पाठ फिरवत आहेत. त्यामुळे वारंवार फेऱ्या राबवून देखील यंदा अकरावीची तब्बल सव्वा आठ लाखांहून अधिक बाके रिकामीच राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### असे आहे विशेष फेरीचे वेळापत्रक

- नवीन कनिष्ठ महाविद्यालय नोंदणी करणे - ३ सप्टेंबर
- कनिष्ठ महाविद्यालयांनी त्यांच्या इच्छेनुसार (व्यवस्थापन, अल्पसंख्याक) कोट्यातील जागा प्रत्यार्पित करणे - ३ सप्टेंबर
- प्रवेश क्षमता वाढविणे - ४ सप्टेंबर
- रिक्त जागा प्रदर्शित करणे - ५ सप्टेंबर
- विशेष फेरीअंतर्गत भरलेल्या अर्जात दुरुस्ती करणे तसेच किमान १० पसंतीक्रम भरणे - ६ आणि ७ सप्टेंबर
- विशेष फेरीसाठी प्रवेश जाहीर करणे - ८ सप्टेंबर
- विशेष फेरीमध्ये अलॉटमेंट झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यासाठी मुदत - ८ आणि ९ सप्टेंबर

Pune Edition
Sep 03, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During September 2025*

### *Section: Education*

लोकमत

# दाखल्यांसाठीचे हेलपाटे थांबणार; कॉलेजात 'आपले सरकार' येणार!

## महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी लागतात विविध कागदपत्रे; पायपीट थांबणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी विविध कागदपत्रे आवश्यक असतात. त्यासाठी विद्यार्थ्यांसह पालकांना सरकारी कार्यालयात हेलपाटे मारावे लागतात. यात वेळ आणि पैसा दोन्ही खर्ची होतो. शिवाय यात होणारा मनस्ताप वेगळा. याची दखल घेत सरकारने आता कनिष्ठ महाविद्यालयात शासन 'आपले सरकार सेवा केंद्र' सुरू करण्याचे ठरविले आहे. यामुळे शैक्षणिक दाखल्यांसाठी विद्यार्थी व पालकांची होणारी पायपीट थांबणार आहे. याबाबत प्रायोगिक तत्त्वावर अहिल्यानगर जिल्ह्यात प्रकल्प राबवण्यात आला होता.

### थेट १७ प्रकारच्या सेवा

अहिल्यानगर जिल्ह्यात १० तालुक्यांतील १५ महाविद्यालयांमध्ये 'आपले सरकार सेवा केंद्र' प्रायोगिक प्रकल्प राबविण्यात आला. तो यशस्वी झाला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. दरवर्षी शिष्यवृत्तीसाठी आवश्यक असणारे 'नॉन-क्रिमिलेयर' आणि उत्पन्नाचे दाखले मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. 'आपले सरकार सेवा केंद्र' सुरू झाल्यावर तब्बल १७ सेवा विद्यार्थ्यांना कॉलेजात उपलब्ध होतील.



### महाविद्यालयाला होणार लाभ

महाविद्यालयाने अर्ज केल्यानंतर तो पालकमंत्री यांच्याकडे मान्यतेसाठी पाठवला जातो. मान्यता मिळाल्यावर जिल्हा प्रशासन संबंधित महाविद्यालयाची माहिती 'महा-आयटी'कडे पाठवते. त्यानंतर 'महा-आयटी'द्वारे लॉग-इन आयडी आणि पासवर्ड दिला जातो. या केंद्रांमधून मिळणाऱ्या दाखल्यांसाठी ५९ रुपये शुल्क आकारले जाईल. यापैकी ३२ रुपये केंद्र चालवणाऱ्या व्यक्तीला दिले जातात. हे केंद्र महाविद्यालयाने सुरू केल्यास त्यातील उत्पन्न महाविद्यालयाला मिळेल.

### सहज शक्य असा उपक्रम

'आपले सरकार सेवा केंद्र' सुरू करणे खूप सोपे असून, यासाठी महाविद्यालयाला वेगळी कोणतीही गुंतवणूक करण्याची गरज नाही. महाविद्यालयात आधीपासून उपलब्ध असलेले संगणक, इंटरनेट आणि प्रिंटर वापरून हे केंद्र सहज सुरू करता येईल.

### अर्ज करण्याची प्रक्रिया

ज्या महाविद्यालयांना 'आपले सरकार सेवा केंद्र' सुरू करायचे आहे, त्यांनी जिल्हा प्रशासनाकडे अर्ज करणे आवश्यक आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात याबाबत एक कार्यशाळा घेण्यात आली. त्यात मान्यताप्राप्त महाविद्यालयांच्या प्राचार्यांना बोलावण्यात आले होते. हे केंद्र विद्यार्थ्यांसाठी कसे फायदेशीर ठरेल आणि कोणत्या सेवा उपलब्ध असतील, याबद्दल माहिती दिली जाणार आहे.




### उत्पन्नाचा दाखला, नॉन क्रिमिलेयरही मिळणार

जिल्ह्यांतील २०० हून अधिक महाविद्यालयांमध्ये लवकरच 'आपले सरकार सेवा केंद्र' सुरू केले जाणार आहे. त्यामुळे शिष्यवृत्तीसाठी आवश्यक विविध दाखल्यांसाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सेतू केंद्रांकडे हेलपाटे मारण्याची गरज नाही. या केंद्रांमुळे विद्यार्थ्यांना 'नॉन-क्रिमिलेयर' आणि उत्पन्नाच्या दाखल्यांसारखे अनेक महत्त्वाचे दाखले थेट महाविद्यालयातच मिळणार आहेत, अशी माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली.

Hello Pune
Page No. 4 Sep 03, 2025
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During September 2025*

## *Section: Education*

लोकमत

# संशोधन वृत्तीवाढीसाठीच्या आविष्कार स्पर्धेत यंदा विद्यापीठातील विविध विभागांचाही असेल सहभाग

### कार्यशाळेस प्रतिसाद; कॉलेज स्तरावर २०पर्यंत होणार स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती वाढावी, ते करीत असलेल्या संशोधनाला चालना मिळावी यासाठी आविष्कार आंतरविद्यापीठस्तरीय संशोधन स्पर्धा घेत आहे. मागील १७ वर्षापासून ही स्पर्धा सुरू असून, दरवर्षीप्रमाणे यंदाही विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. विशेष म्हणजे यंदा विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विभागांनाही सहभागी करून घेतले आहे.



याबाबत विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालय व विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विभागप्रमुखांनी येत्या शनिवार (दि. १३) पर्यंत विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन करायचे आहे. महाविद्यालय स्तरावरील स्पर्धा २० सप्टेंबरपर्यंत घेण्यात येणार असून, पुढील सात दिवसांत विभाग स्तरांवरील पात्र विद्यार्थ्यांची निवड होणार आहे, अशी माहिती आविष्कार संशोधन समितीचे अध्यक्ष डॉ. देविदास वायदंडे यांनी दिली आहे. विभागीय स्तरावरील आविष्कार स्पर्धेचे आयोजन ऑक्टोबरमध्ये करण्याचे प्रस्तावित आहे, असे ते म्हणाले.

जागतिक पातळीवर आपला दर्जा उंचाविण्याच्या दृष्टीने संशोधनाला अधिक भर देत विद्यापीठाने यंदा आविष्कार स्पर्धेसाठी वाढीव निधी दिला आहे. विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. देविदास वायदंडे यांच्या अध्यक्षतेखाली आविष्कार संशोधन समिती स्थापन करण्यात आली आहे. समितीने दिलेल्या शिफारशीनुसार नवीन कार्यपद्धती निश्चित केली आहे. यंदाच्या आविष्कार स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना विद्यापीठातील सायन्स व इनोव्हेशन पार्क इंक्युबॅशन सेंटर आणि ॲस्पायरसारख्या संशोधन प्रोत्साहन योजनांशी जोडून घेतले जाणार असल्याचे ते म्हणाले.

"

**संशोधनांच्या उत्तेजनासाठी यंदा आविष्कार स्पर्धेचा निधी ४८ लाख रुपयांवरून १ कोटी केला. यातून सहभागी प्रत्येक महाविद्यालयाला दहा हजार देण्यात येणार आहेत. तसेच कॅम्पसमधील विभागाला देखील प्रत्येकी १० हजार रुपये मिळणार आहेत. विभागीय स्पर्धेसाठीचा निधी एक लाखवरून दीड लाख केला आहे.**

### संशोधन समन्वयक नेमा

**आविष्कार स्पर्धेसाठी प्रत्येक महाविद्यालय आणि विभाग प्रमुखाने आपल्या संस्थेतील एका अनुभवी प्राध्यापकास संशोधन समन्वयक म्हणून नियुक्त करावे. विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करून स्पर्धेत सहभागी होण्यासाठीची जबाबदारी सोपवले जाणार आहे.**

Pune Main
Page No. 2 Sep 04, 2025
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During September 2025*

## *Section: Education*

लोकमत

# बारावी परीक्षेसाठी सोमवारपासून भरता येणार अर्ज

## शुल्कासह ३० सप्टेंबरपर्यंत अर्ज दाखल करता येणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात येणाऱ्या बारावीच्या परीक्षेसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया सोमवारी (दि. ८) सुरू होणार आहे. मंडळाने परीक्षेचे संभाव्य वेळापत्रक जाहीर केले नसले, तरी फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात सुरू होण्याची शक्यता आहे.

या प्रक्रियेत नियमित विद्यार्थी, पुनर्परीक्षार्थी, खासगी उमेदवार, श्रेणी सुधार योजना, तुरळक विषय; तसेच आयटीआय (ट्रान्स्फर ऑफ क्रेडिट) घेणारे विद्यार्थी अर्ज दाखल करू शकतात. नियमित विद्यार्थ्यांनी आपली अर्ज प्रक्रिया 'यूडायस प्लस'मधील पेन-आयडीवरून ऑनलाइन पद्धतीने संबंधित कनिष्ठ महाविद्यालयामार्फत पूर्ण करावी. नोंद नसल्यास संपूर्ण माहिती भरून, अर्ज भरता येणार आहे. व्यवसाय अभ्यासक्रम घेणारे विद्यार्थी, पुनर्परीक्षार्थी, खासगी विद्यार्थी व इतर पात्र गटांचे अर्जही प्रचलित पद्धतीने ऑनलाइन भरले जाणार आहेत. कनिष्ठ महाविद्यालयांनी अर्ज प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी, अशा सूचना राज्य मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी परिपत्रकाद्वारे दिल्या आहेत.दि. ८ ते ३० सप्टेंबर हा नियमित शुल्कासह अर्ज भरण्याचा कालावधी असेल. अर्ज भरल्यानंतर कनिष्ठ महाविद्यालयांनी त्यांच्या लॉगइनवरून प्रि-लिस्टची प्रिंट काढून जनरल रजिस्टरनुसार पडताळणी करून विद्यार्थ्यांच्या स्वाक्षऱ्या घेऊन, त्यावर प्राचार्यांचा शिक्का आणि स्वाक्षरी घेत ती यादी मंडळाकडे पाठवणे आवश्यक आहे. अर्ज प्रक्रिया सुरू करण्यापूर्वी कनिष्ठ महाविद्यालयांनी कॉलेज प्रोफाईलमध्ये विषय, शिक्षक व इतर माहिती अद्ययावत करणे बंधनकारक आहे. तसेच परीक्षा शुल्काचा भरणा आरटीजीएस/ एनईएफटीद्वारे करावयाचा असून पावती व प्रिलिस्ट जमा करण्याची तारीख मंडळाकडून लवकरच कळविण्यात येणार आहे.

Pune Main
Page No. 11 Sep 05, 2025
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During September 2025

## Section: Education

पुढारी

# संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रिया गुणवत्तेनुसारच राबवा

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी राबविण्यात येणाऱ्या प्रवेश प्रक्रियेतील संस्थात्मक कोट्यातील प्रवेश आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांसाठी गुणवत्तेनुसारच प्रवेश प्रक्रिया राबवावी, असे स्पष्ट निर्देश राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष अर्थात सीईटी सेलने संबंधित उच्च शिक्षण संस्थांना दिले आहेत.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी तंत्रशिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या संस्थांचे संचालक किंवा प्राचार्य संस्थात्मक कोट्यातील प्रवेश आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियानंतर रिक्त जागांसाठी माहिती पुस्तिकेतील नियम क्र १३. नुसार प्रवेश प्रक्रिया राबविण्यात यावी. प्रवेश प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने आणि विद्यार्थ्यांच्या इंटर-से-मेरिट नुसारच पार पाडण्यात यावी. तसेच, प्रवेशाचे नियम निर्दिष्ट करणारी माहिती पुस्तिका, तसेच संस्थांनी विद्यार्थ्यांचे अर्ज मागविण्यासाठी जाहिराती आणि संस्था स्तरावरील प्रवेश प्रक्रियेच्या संपूर्ण वेळापत्रकासह उपलब्ध जागांची माहिती संस्थेच्या वेबसाइटवर प्रदर्शित करावी.

पात्र उमेदवार संस्था स्तरावरील प्रवेश प्रक्रियेसाठी संबंधित संस्थेकडे अर्ज करतील. जे उमेदवार संस्था स्तरावरील प्रवेश प्रक्रियेसाठी संबंधित संस्थेकडे अर्ज करू शकले नाहीत. अशा उमेदवारांसाठी सीईटी पोर्टलवर संस्था स्तरावरील प्रवेश प्रक्रियेसाठी पसंतिक्रम उपलब्ध करून देण्यात आलेले होते. विद्यार्थ्यांनी सीईटी पोर्टलवर संस्था स्तरावरील प्रवेश प्रक्रियेसाठी पसंतिक्रम भरलेल्या विद्यार्थ्यांची यादी संबंधित संस्थेच्या लॉगिनमध्ये उपलब्ध करून दिली जाणार आहे.

- **सीईटी सेलचे व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या उच्च शिक्षण संस्थांना निर्देश**

ज्या संस्थांनी संस्था स्तरावरील जागा आत्मसमर्पित केलेल्या आहेत किंवा संस्था स्तरावरील कोटा उपलब्ध नाही, अशा संस्थांना फक्त केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांसाठीच संस्थात्मक प्रवेश प्रक्रिया राबविता येतील. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांसाठी प्रवेश प्रक्रिया राबविताना ज्या प्रवर्गासाठी जागा आरक्षित केलेली आहे. त्याच प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्राधान्याने जागा वाटप करण्यात यावे. माहिती पुस्तिकातील नियम क्रमांक १५ नुसार, प्रवेशित विद्यार्थ्यांना काही कारणास्तव प्रवेश रद्द करावयाचा असल्यास प्रवेश रद्द करण्यासाठीची लिंक लॉगीनमध्ये उपलब्ध होणार आहे.

Pune Edition
Sep 06, 2025 Page No. 07
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During September 2025*

### *Section: Education*

# प्रवेशशुल्काचा पत्ताच नाही

## राज्यात बीबीए, बीसीए, बीबीएम, बीएमएस अभ्यासक्रमांची परिस्थिती

हर्ष दुधे
Harsh.Dudhe
@timesofindia.com

**पुणे :** बीबीए, बीसीए, बीबीएम, बीएमएस या पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी केंद्रीभूत प्रवेश फेरीची (कॅप) पहिली फेरी आज, मंगळवारी आठ सप्टेंबरला संपणार आहे. मात्र, अजूनही राज्य सरकारच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने या अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांचे शुल्कच ठरवलेले नाही. त्यामुळे प्रवेशासाठी आलेल्या विद्यार्थ्यांनी किती शुल्क भरायचे, असा पेच निर्माण झाला आहे. यातून राज्य सरकारचे उच्च शिक्षणाकडे कमालीचे दुर्लक्ष होत असल्याचे जाणवत आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५मध्ये बीबीए, बीसीए, बीएमएस, बीएमएम अशा पदवी अभ्यासक्रमांना व्यावसायिक दर्जा मिळाल्याने हे अभ्यासक्रम अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या (एआयसीटीई) अखत्यारित गेले. राज्यात तंत्रशिक्षण संचालनालयाच्या (डीटीई) नियंत्रणाखाली हे अभ्यासक्रम आले आणि प्रवेशासाठी सीईटी सेलमार्फत परीक्षा घेण्यास सुरुवात झाली. त्याचप्रमाणे व्यावसायिक अभ्यासक्रमांचा दर्जा मिळाल्याने शुल्क नियामक प्राधिकरणाने (एफआरए) संबंधित अभ्यासक्रमांचे शुल्क ठरवणे अपेक्षित होते. मात्र, गेल्या वर्षी पहिलेच वर्ष असल्याने राज्यातील विद्यापीठांनी संलग्न महाविद्यालयांसाठी शुल्क ठरवले.

यंदाच्या शैक्षणिक वर्षासाठी एफआरएकडून शुल्क ठरवून ते वेळेत जाहीर करणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने एफआरएच्या प्रशासनाने उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे शुल्काची जबाबदारी ठरविण्यासाठी पत्रव्यवहार केला. मात्र, उच्च व तंत्रशिक्षण विभागाने अजूनही निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे राज्यातील महाविद्यालयांचे शुल्कच ठरलेले नाही. ही परिस्थिती असतानाच सीईटी सेलने पहिल्या फेरीसाठी विद्यार्थ्यांचे प्रवेश जाहीर केले आहेत. या विद्यार्थ्यांना आज सोमवारी प्रवेश निश्चित करण्याची अंतिम तारीख असतानाही शुल्काची माहितीच नाही. शुल्काबाबत विद्यार्थी - पालकांसोबतच महाविद्यालयाचे प्रशासनही अनभिज्ञ आहे. अशा वेळी एखाद्या महाविद्यालयाचे जादा शुल्क ठरल्यास किंवा जादा शुल्क आकारल्यास विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक भुर्दंड बसण्याची शक्यता आहे.

> **"शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी बीबीए, बीसीए अभ्यासक्रमांचे शुल्क कोणी ठरवावे हा निर्णय अजून उच्च व तंत्रशिक्षण विभागाने घेतलेला नाही. मात्र, २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून या अभ्यासक्रमांचे शुल्क एफआरएकडून निश्चित केले जाणार आहे.**
>
> \- डॉ. अर्जुन चिखले, सचिव, एफआरए

- बीसीए महाविद्यालयांची संख्या - ४१०
- एकूण प्रवेशक्षमता - ४३,१२२
- प्रवेशासाठी नोंदणी केलेले विद्यार्थी - १९,९६०

मटा विशेष

### बीबीए, बीसीएसाठी प्रतिसाद घटला

बीबीए, बीसीए, बीबीएम, बीएमएस या पदवी अभ्यासक्रमांना व्यावसायिक दर्जा देण्याची कोणतीही गरज नव्हती. मात्र, या अभ्यासक्रमांना व्यावसायिक दर्जा दिल्यापासून या अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांकडून मिळणारा प्रतिसादच कमी झाला आहे. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या सीईटीला विद्यार्थ्यांची नोंदणी कमी होत असल्याने सीईटी सेलला दोन वेळा सीईटी घेण्याची वेळ आली आहे. मात्र, अजूनही अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे व्यावसायिक दर्जा दिल्याने फायदा होण्याऐवजी तोटा अधिक झाल्याचे चित्र आहे.

Maharashtra Times 8.9.2025

# *News Paper Clippings During September 2025*

## *Section: Education*

पुढारी

पुढारी ANCHOR

# शाळांमध्ये आता विद्यार्थी समूहाची स्थापना

## विद्यार्थ्यांच्या कलागुण, कौशल्य, चिकित्सक वृत्तीला चालना देण्याचा उद्देश

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**राज्यातील प्राथमिक, माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये आता विद्यार्थी समूह स्थापन करण्यात येणार आहेत. त्यात अभ्यासक्रमातील विषय, छंद, पर्यावरण, स्पर्धा परीक्षा, वाचन, व्यावसायिक शिक्षण, तंत्रज्ञान अशा विविध ३४ समूहांचा समावेश असून, या विद्यार्थी समूह स्थापन करण्यामागे विद्यार्थ्यांच्या कृतिशीलतेला, अंगभूत कौशल्याला, कल्पकतेला, चिकित्सक वृत्तीला चालना देण्याचा उद्देश आहे. शाळांना १५ सप्टेंबरपर्यंत समूह स्थापनेचे निर्देश देण्यात आले आहेत.**

राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेचे (एससीईआरटी) संचालक राहुल रेखावार यांनी या बाबतच्या सूचना परिपत्रकाद्वारे राज्यातील उपसंचालक, जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्थांचे प्राचार्य, जिल्हा परिषदांचे प्राथमिक, माध्यमिक शिक्षणाधिकारी, शिक्षण निरीक्षक यांना दिले आहेत. पहिली ते बारावीच्या शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी समूह स्थापनेबाबत एससीईआरटीने विद्यार्थी समूह



मार्गदर्शिका ही पुस्तिका संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०, राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण २०२४ मधील निदर्शकांनुसार एकूण ३४ समूह निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुसार समूहांची स्थापना करून त्यांचे कार्यान्वयन करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच विद्यार्थी समूहांची शाळांमध्ये सुयोग्य स्थापना, कार्यान्वयन, जिल्ह्यातील विविध स्तरांवर योग्य समन्वयन व्हावे, यासाठी जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था प्राचार्य, प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, वर्गशिक्षक यांची जबाबदारीही निश्चित करून देण्यात आली आहे.

विद्यार्थी संख्येप्रमाणे शक्य तितके विद्यार्थी समूह विद्यार्थ्यांच्या आवडी आणि कल लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना ताण येऊ न देता १५ सप्टेंबरपर्यंत स्थापन करावेत. प्रत्येक विद्यार्थी किमान एका समूहात समाविष्ट असेल याची खात्री करावी. निश्चित केलेल्या ३४ समूहांव्यतिरिक्त नवीन विद्यार्थी समूह स्थापन करायचा असल्यास आधी तो ३४ समूहांमध्ये समाविष्ट होऊ शकणार नाही याची शाळास्तरावरच खात्री करावी आणि त्यानंतरच तो नवीन विद्यार्थी समूह स्थापन करावा. नवीन विद्यार्थी समूहासाठी पुस्तिकेतील नमून्याप्रमाणे मार्गदर्शक सूचना तयार कराव्यात. त्याची एक प्रत डाएटला माहितीस्तव पाठवावी. त्यावर डाएटने योग्य तो अभिप्राय शाळेला द्यावा. डाएटने प्राप्त प्रस्ताव एससीईआरटीला आवश्यक त्या दुरुस्त्यांसह पाठवावेत. तसेच, डाएटने एक अधिव्याख्याता यांची समन्वयक अधिकारी म्हणून नेमणूक करून सर्व शाळांना त्याबाबत कळवावे, असे स्पष्ट केले आहे.

My Pune Edition
Sep 10, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During September 2025*

### *Section: Education*

पुढारी

# अकरावी प्रवेशासाठी एक दिवस मुदतवाढ

- आज शेवटचा दिवस
- प्रवेशासाठी अद्यापही साडे आठ लाखांच्या जवळपास जागा रिक्तच

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील राबविण्यात येत असलेल्या अकरावी प्रवेश प्रक्रियेतील विशेष फेरीतील प्रवेशांसाठी बुधवारपर्यंत (दि. १०) मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी दिली आहे.

सर्वांसाठी खुला प्रवेश अंतर्गत विशेष फेरीची निवडयादी रविवारी प्रसिद्ध करण्यात आली. त्यात कला शाखेसाठी ४ हजार ४३७, वाणिज्य शाखेसाठी ३ हजार ९७९, तर विज्ञान शाखेसाठी ६ हजार ९०४ अशा एकूण १५ हजार ३२० विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर करण्यात आला. त्यापैकी ३ हजार २१८ विद्यार्थ्यांनी केंद्रीभूत प्रक्रियेद्वारे, तर ३६१ विद्यार्थ्यांनी राखीव कोट्याद्वारे प्रवेश घेतला. तर ११ हजार ७४१ विद्यार्थ्यांचे प्रवेश बाकी आहेत. मुंबई विभागात सोमवारी (८ सप्टेंबर) सुटी जाहीर करण्यात आली होती. त्यामुळे विद्यार्थ्यांना विशेष फेरीअंतर्गत कनिष्ठ महाविद्यालयात जाऊन प्रवेश निश्चित करण्यासाठी १० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिल्याचे स्पष्ट केले आहे.

अकरावी प्रवेशासाठी राज्यात ९ हजार ५४४ महाविद्यालयांमध्ये १८ लाख २२ हजार २९८ जागा कॅप प्रवेशाच्या तसेच ३ लाख ४५ हजार २४४ जागा कोटा प्रवेशाच्या अशा एकूण २१ लाख ६७ हजार ५४२ जागा उपलब्ध आहेत. त्यासाठी १४ लाख ८३ हजार ३३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्यापैकी ११ लाख ५६ हजार ५७८ विद्यार्थ्यांनी कॅपमधून तर १ लाख ६८ हजार ६२ विद्यार्थ्यांनी कोटाअंतर्गत अशा १३ लाख २४ हजार ६४० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. आता प्रवेशासाठी अद्यापही ६ लाख ६५ हजार ७२० जागा कॅप प्रवेशाच्या तसेच १ लाख ७७ हजार १८२ जागा कोटा प्रवेशाच्या अशा एकूण ८ लाख ४२ हजार ९०२ जागा प्रवेशासाठी उपलब्ध असल्याचे स्पष्ट केले आहे.

Pune Edition
Sep 10, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During September 2025*

### *Section: Education*

# 'All of us disappointed': NIRF rank drop hot topic at SPPU Management Council meeting

SOHAM SHAH
PUNE, SEPTEMBER 9

The recent drop in National Institutional Ranking Framework (NIRF) ranking was a major topic of discussion at a meeting of the Management Council of Savitribai Phule Pune University (SPPU) today. The university was ranked 91 in the Overall category in this year's ranking, a big slide from rank 37 it achieved last year. The meeting lasted for four hours, of which over two hours were spent in discussing the ranking drop.

Dr Jyotsna Ekbode, a member of the council, told The Indian Express, "All of us have felt very disappointed about these rankings, including the Vice-Chancellor. Our university that we say is number 1 in Maharashtra, has fallen in the ranking. The main point raised by everybody was that the number of faculty is extremely small. Teachers, and even non-teaching staff. The university is running on one-third of the required staff. Even the non-teaching staff get exhausted. We are hearing that 111 people will be hired in the last two years, but there is no progress on that either."

She added, "We have decided that we will introspect and call for some corrective measures. We had other agendas discussed today as well, but all members spoke on this.. Even though as council members we don't teach or do research at the university, we are also at fault and no one is denying that something has gone wrong."

Sagar Vaidya, another member, said, "A detailed analysis was done in today's Management Council meeting regarding the decline in the ranking. While the mistakes were highlighted, it was decided to carry out work on future opportunities. Professor recruitment is definitely a reason but apart from that, the members have decided to work on a 'plan of success' regarding research, public perception, examinations, hostels etc."

Vice-Chancellor Suresh Gosavi said, "We have tried to analyse where we are lagging behind so that we can overcome it in due time. It was a discussion with the members, the data is there and we tried to see how to fix it. For example, how many economically and socially challenged students join the college is dynamic data and it changes every year. Diversity of students is not in anyone's hand. We are still working on the complete data analysis."

The Indian Express 10.9.2025

# *News Paper Clippings During September 2025*

## *Section: Education*

# Exam centres that reported copying to shut down

Ardhra.Nair
@timesofindia.com

**Pune:** Examination centres for SSC and HSC where copying cases were registered in 2025 or those with students less than 250 in Std XII and 200 in Std X may be closed next year (Feb-March 2026), officials from Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education said on Thursday.

They said schools with remote examination centres with limited students can approach the divisional boards and can function after their claims are verified, they added.

Board chairman Sharad Gosavi said, "Centres where malpractices were found in Feb-March 2025 exams by the flying squad or external agencies will be closed down. There are over 130 such centres. We won't close those where teachers from the school found and reported cheating cases."

## STRICT ACTION

As per rules, exam centres in the city areas must have at least 200 students enrolled for Std X and 250 for Std XII. "In rural areas, the numbers are 125 and 150 for SSC and HSC, and in extremely difficult or remote areas, the minimum student strength should be 100 and 125 for SSC and HSC, respectively. We want to strictly follow this rule," Gosavi added.

Fewer exam centres mean students get facilities like electricity, water and good benches, they are easier to monitor and there is a check on malpractices, he added.

"Students' interests will be at the centre of all decisions. We will hold hearings for centres that do not meet these criteria. If closing down a centre means students have to travel 20km to the nearest one, we won't close them. Nor will those in extremely difficult areas or tribal areas where exam centres, even if within a 5km radius, are hard to reach," Gosavi said, adding that currently there are 8,500 centres.

The board called for applications for new centres with facilities like CCTV cameras.

The Times of India 12.9.2025

## *News Paper Clippings During September 2025*

### *Section: Education*

प्रभात

# विद्यार्थ्यांसाठी आता उत्पन्नाचा दाखला एकदाच

## अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत शिष्यवृत्ती मिळणार : राज्यातील लाखो विद्यार्थ्यांना मोठा दिलासा

**मुंबई, दि. १८ -** महाराष्ट्र सरकारने विद्यार्थ्यांना मोठा दिलासा दिला असून शिष्यवृत्तीसाठी आता वारंवार उत्पन्न दाखला आणि कागदपत्रे द्यावी लागणार नाहीत. महाडीबीटी पोर्टलवर एकदाच अपलोड केलेली माहिती ग्राह्य धरण्यात येणार असून ऑटो सिस्टीमद्वारे शिष्यवृत्ती वेळेत विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा होणार आहे.



राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष (सीईटी सेल) आणि तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत (डीटीई) व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेत विद्यार्थी एकदाच उत्पन्नाचा दाखला आणि इतर आवश्यक कागदपत्रे सादर करतात. ही प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन व ऑफलाइन पडताळणी करून केली जाते. त्यामुळे अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत शिष्यवृत्तीसाठी पुन्हा तीच माहिती मागवू नये, असे निर्दे श उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले.

### शिष्यवृत्ती प्रक्रियेत सुधारणा करण्याचे निर्देश

मंत्रालयात झालेल्या आढावा बैठकीत अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी), इतर मागासवर्गीय (ओबीसी), आर्थिक दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग (एसईबीसी) आणि इतर प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती वेळेत मिळावी यावर चर्चा झाली.

चंद्रकांत पाटील म्हणाले, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेशिवाय अन्य अभ्यासक्रमांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी महाडीबीटी पोर्टलवर कागदपत्रे अपलोड करावे लागतात. शिष्यवृत्तीसाठी एकदा विद्यार्थ्यांकडून माहिती अपलोड केल्यानंतर नव्याने माहिती घेण्याची आवश्यकता राहणार नाही, यासाठी संबंधित विभागांनी सुक्ष्म नियोजन करावे. त्यामुळे शिष्यवृत्ती अर्जाच्या छाननीसाठी लागणाऱ्या वेळेची बचत होईल. तसेच प्रवेशीत विद्यार्थ्यांचा अचूक डेटाही उपलब्ध होईल. विद्यापीठांनीसुद्धा शिष्यवृत्तीसाठी आवश्यक असणारी कागदपत्रे पुन्हा तपासावी लागणार नाही. विद्यार्थ्यांनाही वांरवार तिच माहिती द्यावी लागणार नसल्याने त्यांच्या शिष्यवृत्ती मिळण्यातील टप्पे कमी होतील.

विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात केंद्र सरकारच्या हिस्स्याची ६०% रक्कम वेळेत जमा व्हावी यासाठी विशेष कार्यप्रणाली तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सामाजिक न्याय, आदिवासी विकास आणि इतर मागास विभागांनी यासाठी कालबद्ध नियोजन करावे, असेही आदेश देण्यात आले.

### प्रक्रिया होणार सुलभ

- महाडीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांना एकदाच कागदपत्रे अपलोड करावी लागतील
- वारंवार तिच माहिती देण्याची आवश्यकता राहणार नाही
- विद्यापीठांनाही पुन्हा कागदपत्रे तपासण्याची गरज पडणार नाही
- वेळेची बचत होईल आणि विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती लवकर मिळेल

Pune City Edition
Sep 19, 2025 Page No. 2
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During September 2025*

## *Section: Education*

# Test for exam centres

## Strict rules from Feb 2026; those found guilty of misconduct will be closed

Pratiksha Parkhi
feedback@punemirror.com
@ThePuneMirror

In a sweeping crackdown on exam-related malpractices, the Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education has announced that any examination centre found guilty of misconduct will be permanently de-recognised. The new policy will be enforced from the February–March 2026 SSC and HSC exams.

The board has also decided to restructure the exam centre system across urban, rural and remote regions. Minimum student counts have now been made mandatory: 200 for SSC and 250 for HSC in urban areas, 125 and 150 respectively in rural zones, and 100 to 125 in remote locations. Centres failing to meet these thresholds will be shut down.

This move could lead to the closure of several small centres across the state. However, if a centre is deemed essential for student convenience in a particular area, a proposal must be submitted to the divisional board. Such proposals will be approved only after strict scrutiny, the board clarified.

While the decision is tough, the board insists it is necessary to maintain transparency and discipline in the examination process. With malpractice cases rising each year, decisive action against errant centres has become unavoidable. Divisional boards have been instructed to act swiftly and submit detailed reports.

Some educational institutions have raised concerns that the decision may inconvenience students, especially in rural and remote areas, who may be forced to travel long distances for exams.

Professor Manoj Patil, president of the State Principals' Federation, has demanded an immediate rollback of the decision. He argued that schools and colleges meeting board norms should be allowed to retain their exam centre status and that older centres should not be shut without valid reason.

While the board's move aims to clean up the examination system, its impact on students and schools will become clearer in the coming months.



PIC FOR REPRESENTATIONAL PURPOSES ONLY

Pune Mirror 19.9.2025

## *News Paper Clippings During September 2025*

### *Section: Education*

# SCERT starts PM e-Vidya in state with five educational DTH channels for Classes 1 to 12

**Kimaya Boralkar**

puneletters@hindustantimes.com

**PUNE:** The State Council of Educational Research and Training (SCERT) started five education-specific DTH (direct-to-home) channels on September 17 under the PM e-Vidya initiative, launched in 2020 to provide students of Class 1-12 multi-mode access to digital and broadcast education.

Under this initiative, 200 educational channels are being operated across the country, with five specifically earmarked for Maharashtra. These five channels have been divided according to class groups, ensuring that each channel delivers subject-specific, curriculum-linked lessons tailored for these grades.

Each channel broadcasts six hours of structured educational content daily, covering key school subjects, that are repeated three times over a 24-hour period. Besides being available on DD Free Dish, the broadcasts are also live-streamed on YouTube.

The SCERT has urged teachers, education officers, and parents to subscribe to these channels on YouTube so that students can take advantage of the learning resources from home. A state-level coordination mechanism has been established to monitor academic quality and technical standards, maintain updated timetables, and ensure that the programmes reach schools and households.

Monthly schedules and links to the live streams are available on the SCERT website (www.maa.ac.in) under the PM eVidya tab. Education officials said that by bringing structured, curriculum-linked video content into homes, the initiative will help to close the gap between rural and urban education. Students will gain access to learning materials while teachers will find resources to strengthen classroom instruction.

SCERT director Rahul Rekhawar said, "Through PM eVidya, we are ensuring that quality education reaches every child, regardless of their location."

Hindustan Times 19.9.2025

# *News Paper Clippings During September 2025*

## *Section: Education*

पुढारी

# आता महाविद्यालयांना ऑनलाइनच मान्यता!

पुणे : पुढारी वृत्तसेवा

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न उच्च शिक्षण संस्थांना शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी नवीन महाविद्यालय तसेच विस्तारीकरणांतर्गत अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी याबाबतचे प्रस्ताव आता ऑनलाइनच सादर करावे लागणार आहेत. त्यासाठी येत्या ३० सप्टेंबरपर्यंत मुदत दिल्याची माहिती विद्यापीठाच्या प्रभारी कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे यांनी दिली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम ७६ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या (माहेड) मान्यतेनुसार शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी मान्यतेसंदर्भातील नियमावलीत सुधारणा केली आहे. त्यानुसार नवीन

- 'एनसीपीएस' या ऑनलाइन प्रणालीमार्फत ३० सप्टेंबरपर्यंत करावा लागेल अर्ज

महाविद्यालय तसेच विस्तारीकरणांतर्गत अभ्यास पाठ्यक्रम, विषय, विद्या शाखा, अतिरिक्त तुकडी याबाबतचे प्रस्ताव सादर करण्यासाठी न्यू कॉलेज परमिशन सिस्टम अर्थात एनसीपीएस या ऑनलाईन प्रणालीमार्फत सादर करण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत. यापुढे विद्यापीठाकडून ऑफलाइन प्रस्ताव स्वीकारण्यात येणार नाही. त्यामुळे https://htedu.maharashtra.gov.in/NCPS या संकेतस्थळावर नवीन प्रस्ताव सादर करावेत, असे देखील विद्यापीठ प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### विधी महाविद्यालयांना तीन वर्षे मान्यता नाही...

'बार काउन्सिल ऑफ इंडिया'ने नवीन विधी महाविद्यालयांना पुढील तीन वर्षे परवानगी न देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार विस्तारीकरणांतर्गत विधी संदर्भातील नवीन अभ्यासक्रम, विद्याशाखा विषय, नवीन तुकडी या संदर्भातील प्रस्तावाबाबत केवळ बार काउन्सिल ऑफ इंडियाचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणाऱ्या महाविद्यालयांचे प्रस्ताव महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ, २०१६ च्या कलम २०९ (४) (ग) नुसार स्वीकारणे गरजेचे आहे, असेदेखील विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

Pune Edition
Sep 23, 2025 Page No. 07
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During September 2025*

## *Section: Education*

# परीक्षा शुल्कवाढीसह रँकिंगवर अधिसभेत होणार चर्चा

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क (एनआयआरएफ) रँकिंगमध्ये मोठी घसरण झाली. घसरत्या रँकिंगच्या मुद्द्यावर विद्यापीठ क्षेत्रातून अनेक मतप्रवाह पुढे येत असताना विद्यापीठाच्या अधिसभेत देखील यावर घमासान होणार हे स्पष्ट आहे. अधिसभा सदस्यांनी रँकिंगचे निकष आणि उपाययोजना याबाबत विविध प्रस्ताव आणि प्रश्न सादर करण्यात आले आहेत. वाढविण्यात आलेल्या परीक्षा शुल्कावरून देखील अधिसभेत वादळी चर्चा होण्याची शक्यता आहे.

पुणे विद्यापीठाची यावर्षीची (सन २०२५) दुसरी अधिसभा मंगळवारी होत असून विद्यापीठ प्रशासनाकडून अंतिम कार्यक्रमपत्रिका जाहीर करण्यात आली. पुणे विद्यापीठाचे यंदाचे एनआयआरएफ रँकिंग ९१ व्या स्थानापर्यंत खाली आले. त्यामुळे विविध विद्यार्थी संघटनांनी आक्रमक पवित्र घेत थेट कुलगुरूंच्या राजीनाम्याची मागणी केली. तर काहींनी विद्यापीठाच्या आधिसभा व व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांच्या राजीनामाची मागणी केली. विद्यापीठाचे घसरलेले रँकिंग बाबत एका संस्थेने चर्चासत्राचे आयोजन केले होते. यामुळे पुढील काळात विद्यापीठाच्या रँकिंग वाढीसाठी कशा पद्धतीने तयारी केली जाणार हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.



### शेतकऱ्यांच्या मुलांची शुल्कमाफी होणार का?

विद्यापीठाने गेल्या काही वर्षांपासून परीक्षा शुल्कात वाढ केली नव्हती. सध्या परीक्षा शुल्कात २० टक्के वाढ करण्यात आली. मात्र राज्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. विद्यापीठात शिक्षण घेणारे बहुतेक विद्यार्थी हे शेतकरी कुटुंबातील असल्याने या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क भरणे अडचणीचे झाले आहे. त्यामुळे वाढीव परीक्षा शुल्कावरही अधिसभेत चर्चा होणार असून बाधित शेतकऱ्यांच्या मुलांची शुल्कमाफी होणार का? याकडे लक्ष लागले आहे.

अधिसभा सदस्य डॉ. योगेश भोळे यांनी घसरण रोखण्यासाठी स्वतंत्र एनआयआरएफ मॉनिटरींग डॅशबोर्ड विकसित करावे, डॉ. अपर्णा लळिंगकर यांनी रँकिंग मध्ये सुधारणा करण्यासाठी संशोधन समिती गठीत करण्याची मागणी केली. दादाभाऊ शिनलकर यांनी या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यासाठी विशेष अधिसभा बोलविण्याची मागणी केली आहे. तर राहुल पाखरे यांनीही समितीची मागणी केली आहे. बाकेराव बस्ते यांनी विद्यापीठाचा दर्जा घसरण्यामागची कारणे आणि अधिसभेत यासंदर्भात निवेदन करणार का? असा प्रश्न उपस्थित केला आहे. यास उत्तर देताना व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. धोंडीराम पवार म्हणाले, कुलगुरू अधिसभेत सविस्तर मांडणी करणार आहेत. एनआयआरएफ व क्युएस रँकिंग याचे निकष वेगवेगळे आहेत. येणाऱ्या काळात काही निकषांवर आपल्याला लक्ष केंद्रित करावे लागेल. राहुल पाखरे यांनी एनआयआरएफच्या निकषां-मधील सुधारणेसाठी पुणे विद्यापीठ काय उपाययोजना करीत आहे, असा प्रश्न उपस्थित केला.

Kesari 28.9.2025

# *News Paper Clippings During September 2025*

## *Section: Education*

### 25-30% of Seats In UG & PG Courses Vacant At Pune University

# PhD admissions at SPPU down from 235 to just 17 over three-year period

Ardhra.Nair@timesofindia.com

**Pune:** Around 25%-30% of the seats in undergraduate and postgraduate courses offered by Savitribai Phule Pune University had been vacant in the last three years, while PhD admissions came down to 17 in 2024-25 from 235 in 2021-22. These were revealed in the answer to a senate member's question published in the agenda of the upcoming senate meeting, scheduled to be held on Sept 30.

Among the issues raised by senate members in the agenda, the university's drop from 37th in the overall NIRF (National Institutional Ranking Framework) ranking last year to 91st this year is expected to be discussed the most.

The drastic drop in PhD admissions directly impacts national and international rankings because the number of research papers published in reputed journals is a major criterion.

Dadabhau Shinalkar, SPPU senate member, said the biggest matter is the fall in ranking. "This is about the reputation of the university. Nowadays, parents have money, but they want quality. If private universities get better rankings, they will go for them. We need to take a hard look at what is going wrong and then come up with an action plan," he said.

One of the reasons for the drop in numbers, given by university officials, is the mushrooming institute-affiliated colleges, private and deemed universities, offering same courses. "Admissions were made in some departments at full capacity. Due to various reasons, some students cancelled their admissions over time. However, as the last date for admissions passed, those seats remained vacant," said the reply to senate member Shantanu Lamdhade's question.

Lamdhade, however, called these reasons excuses. "The university has not done anything to publicise its courses. Secondly, the placements are low. As per the university's answer, only 497 students had been placed directly in the last five years. Then there are departments or courses which are getting very low response from students. Hence, it is time to check whether we need to keep running those courses or change them. There is a need to innovate and appoint deserving people to key positions instead of giving additional charges to people who already have full-time responsibilities," Lamdhade said.

File pic



The university has also dropped places in the national ranking

The Times of India 28.9.2025

# *News Paper Clippings During September 2025*

## *Section: Education*

# संशोधनासह पेटंट दाखल करण्यावर भर

## पुणे विद्यापीठाचा मानस : 'एनआयआरएफ'मधील घसरणीनंतर लक्ष केंद्रित

**पुणे, ता. २७ : राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी फ्रेमवर्कमध्ये (एनआयआरएफ) झालेल्या मोठ्या घसरणीनंतर अखेर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ खडबडून जागे झाले आहे. विद्यापीठाच्या राष्ट्रीय आणि जागतिक रँकिंगमधील क्रमवारीत सुधारणा करण्यासाठी विद्यापीठाने बौद्धिक संपदा हक्क कक्षाची (आयपीआर कक्ष) स्थापना केली आहे.**

प्राध्यापक आणि संशोधक विद्यार्थ्यांसाठी क्षमता विकास कार्यशाळांचे आयोजन केले जाईल. यात पेटंट दाखल करण्याबाबत मार्गदर्शन, तांत्रिक साहाय्य, कॉपीराइट आणि ट्रेडमार्क संरक्षणाची माहिती देण्यात येईल. याशिवाय विद्यापीठाला संशोधनासाठी मिळणाऱ्या निधीत वाढ व्हावी, यासाठी प्रायोजित आणि सल्लागार प्रकल्प वाढविण्यावर भर दिला जाईल, अशी माहिती विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाने दिली.

विद्यापीठाची अधिसभा मंगळवारी (ता. ३०) होणार आहे. या अधिसभेत सदस्य राहुल पाखरे यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाने ही माहिती दिली. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने देशातील सर्वोत्कृष्ट शिक्षण संस्थांचे 'एनआयआरएफ' क्रमवारी सप्टेंबरच्या सुरुवातीला जाहीर केली. यात देशातील सर्वोत्कृष्ट १०० संस्थांच्या क्रमवारीत गेल्या वर्षापर्यंत ३७व्या क्रमांकावर असणारे विद्यापीठ यंदा थेट ९१व्या क्रमांकापर्यंत घसरले. विद्यापीठाची गेल्या पाच वर्षांत सुरू असलेल्या घसरणीनंतर यंदा झालेली मोठी घसरण पाहता, विद्यापीठाच्या कामकाजावर विविध स्तरांतून ताशेरे ओढण्यात आले. याच विषयावर यंदाची अधिसभादेखील गाजणार असल्याचे चित्र आहे.

विद्यापीठात क्यूएस, एनआयआरएफ अशा रँकिंगचा अभ्यास करून त्यातील निकषांवर सुधारणा करण्यासाठी आणि त्याबाबत विविध विभागांकडून माहिती जमा करून घेण्याच्या प्रक्रियेसाठी समन्वयक नेमले आहेत. समन्वयकांचा गट वर्षभर काम करत असतो. आंतरराष्ट्रीय सहकार्य, परदेशी विद्यार्थी आकर्षित करणे, संयुक्त संशोधन प्रकल्प, परदेशी विद्यापीठांशी करार वाढविणे यांवर भर दिला जात आहे. उद्योग आणि समाजाशी संपर्क अधिक दृढ करण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. या वर्षी विद्यापीठाच्या अस्पायर संशोधन योजनेअंतर्गत सात कोटी रुपयांचा निधी संशोधकांसाठी मंजूर झाला. याबाबत अधिसभेत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी सविस्तर मांडणी करणार असल्याचेही विद्यापीठाने स्पष्ट केले.

### वेध अधिसभेचे

**विद्यापीठाचे सामंजस्य करार (२०२० ते २०२५)**

| तपशील | करारांची संख्या |
|---|---|
| आंतरराष्ट्रीय | २८ |
| राष्ट्रीय | १४३ |
| **एकूण** | **१७१** |



### आगामी वर्षात राबविण्यात येणाऱ्या योजना

- उच्च प्रभाव असणाऱ्या जर्नल्समध्ये प्रकाशनांना प्रोत्साहन देणार
- आंतरराष्ट्रीय पेटंट्स आणि तंत्रज्ञान हस्तांतरणावर भर
- रोजगारक्षमतेसाठी कौशल्य विकास कार्यक्रम वाढविणार
- परदेशी विद्यापीठांशी संयुक्त पदवी कार्यक्रम सुरू करणार
- 'हरित कॅम्पस' उपक्रम आणि शाश्वत विकास ध्येयावर आधारित उपक्रम

Sakal 28.9.2025

# *News Paper Clippings During September 2025*

## *Section: Education*

# पीएचडीला फक्त १७ प्रवेश

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची स्थिती; अपुरे मार्गदर्शक कारणीभूत

मटा विशेष

हर्ष दुधे
Harsh.Dudhe@timesofindia.com









**पुणे :** पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात खासगी विद्यापीठांची संख्या वाढत असल्याचा फटका सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला बसत असून, विद्यापीठाच्या ३३ शैक्षणिक विभागांत प्रवेश क्षमतेपेक्षा कमी प्रवेश झाले आहेत. अपुरे मार्गदर्शक आणि पीएचडी प्रवेश प्रक्रियेतील लालफितीच्या कारभाराला कंटाळून शैक्षणिक विभागांत पीएचडी अभ्यासक्रमाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १७वर आली आहे. त्यामुळे विद्यापीठाने परिस्थिती सुधारण्यासाठी तातडीने पावले न उचलल्यास विद्यार्थी नसलेल्या सरकारी शाळेसारखी विद्यापीठाची परिस्थिती होऊ शकते.

### सिनेट सदस्यांकडून प्रश्न

पुणे विद्यापीठाची सिनेट येत्या मंगळवारी (३० सप्टेंबर) होत आहे. या अनुषंगाने अधिसभा सदस्य शंतून लामधाडे यांनी प्रवेश प्रक्रिया, झालेले प्रवेश, पीएचडीला प्रवेश घेतलेले विद्यार्थी आदींबाबत प्रश्न उपस्थित केले. त्या वेळी विद्यापीठाच्या मॅनेजमेंट कौन्सिल सदस्य डॉ. संगीता जगताप यांनी माहिती दिली.

### खासगी विद्यापीठांमुळे?

पुणे विद्यापीठाशी संलग्न इतर महाविद्यालयांमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकवले जात आहेत. पुणे शहरात खासगी आणि अभिमत विद्यापीठे स्थापन झाली असून, तेथेही संबंधित अभ्यासक्रम राबवले जात आहेत. त्यामुळे शैक्षणिक संकुलात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी झाल्याचे स्पष्टीकरण विद्यापीठ देत आहे.

### सलग चार वर्षे प्रवेशांत घट

पुणे विद्यापीठात सध्या शैक्षणिक विभाग; तसेच अभ्यास केंद्र मिळून साधारण ५६ ठिकाणी पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू आहेत. त्यापैकी ३३ विभागांत प्रवेश क्षमतेच्या कमी प्रवेश झाल्याची माहिती विद्यापीठ प्रशासनाने दिली आहे. विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या माहितीनुसार, सलग चार वर्षांपासून प्रवेश कमी होत असल्याचे समोर आले आहे.

### गाइडच उपलब्ध नाही

अशीच परिस्थिती पीएचडी अभ्यासक्रमांच्या प्रवेशांची आहे. शैक्षणिक संकुलात प्राध्यापकांची बरीच पदे रिक्त असल्याने, संशोधनासाठी मार्गदर्शन करायला गाइड उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत पीएचडीच्या जागा कमी झाल्या आहेत. त्यामुळे प्रवेशासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली आहे. त्यातच प्रशासनातील लालफितीच्या कारभारामुळे अनेकांना पीएचडी पूर्ण करण्यास उशीर होतो. या दोन्ही बाबींचा परिणाम प्रवेशांवर झाला आहे. गेल्या चार वर्षांत ही संख्या २३५हून १७वर आली आहे. ही परिस्थिती फार गंभीर असून, यावर उपाययोजना न केल्यास विद्यापीठातून संशोधक घडण्याची प्रक्रियाच बंद पडेल, अशी शक्यता वर्तविण्यात आली आहे.

### अधिछात्रवृत्ती, संशोधन पत्रिकांच्या संख्येत घट

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यापीठ फंडातून दर वर्षी २० विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती देण्यात येते. मात्र, अपेक्षित पात्रताधारक संशोधकच मिळत नसल्याने, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात १४ विद्यार्थ्यांची निवड अधिछात्रवृत्तीसाठी करण्यात आली. ही परिस्थिती असतानाच, संशोधन पत्रिकाही प्रसिद्ध होण्याचे प्रमाण कमी झाल्याची कबुली विद्यापीठाने दिली आहे.

### ही आहेत कारणे...

- प्राध्यापकांची बरीच पदे रिक्त असणे.
- संशोधनासाठी मार्गदर्शन करायला गाइड उपलब्ध नसणे.
- प्रशासनातील लालफितीच्या कारभारामुळेही पीएचडीला उशीर.

Maharashtra Times 28.9.2025

# News Paper Clippings During September 2025

## Section: Education

लोकमत

# आता शाळेतही शिकवणार आयुर्वेद

### अभ्यासक्रमात समावेश करण्याची सरकारची तयारी

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** शालेय व महाविद्यालयीन स्तरावरील आरोग्य शिक्षणाच्या अभ्यासक्रमात आयुर्वेदाचा समावेश करण्याच्या दिशेने सरकारने पाऊल उचलले असून, या माध्यमातून विद्यार्थ्यांना सर्वांगीण आरोग्याच्या संकल्पना समजावून सांगण्याचे उद्दिष्ट असल्याचे असे केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी सांगितले. एनसीईआरटी आणि यूजीसी यांच्या सहकार्याने शालेय शिक्षण व उच्च शिक्षणासाठी अभ्यासक्रमाचे आराखडे तयार केले जात आहेत.



### ग्रामीण भागात आरोग्यसेवेचा विस्तार

ग्रामीण व दुर्गम भागात प्राथमिक आरोग्यसेवा सुलभ करण्यासाठी हेल्थ अँड वेलनेस सेंटर्समध्ये आयुष डॉक्टरांची नेमणूक करण्यात येत आहे. तसेच देशभरात आयुष आरोग्य केंद्रे आणि औषधी उद्याने उभारण्याचे काम सुरू आहे.

Pune Main
Page No. 3 Sep 29, 2025
Powered by: erelego.com

प्रभात

# पुणे विद्यापीठाची अधिसभा ठरणार वादळी

## 'एनआयआरएफ'मधील घसरणीवर सदस्य प्रशासनाला धरणार धारेवर

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २८** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची राष्ट्रीय संस्थात्मक मानांकन आराखड्यातील (एनआयआरएफ) स्थान घसरल्याचे तीव्र पडसाद येत्या मंगळवारी होणाऱ्या अधिसभेत (सिनेट) उमटणार आहेत. याच विषयावर अधिसभा सदस्य प्रशासनास धारेवर धरणार आहेत. घसरणीच्या चौकशीसाठी तज्ज्ञांची समिती नेमण्याचा ठरावही मांडण्यात आल्याने ही बैठक वादळी होण्याची चिन्हे आहेत.

मागील वर्षी देशातील सर्वोत्कृष्ट विद्यापीठांच्या यादीत ३७ वे स्थान मिळवणाऱ्या विद्यापीठाची यंदा ९१ व्या स्थानावर झालेली घसरण शिक्षण वर्तुळात आणि विद्यार्थी संघटनांमध्ये चिंतेचा विषय ठरली आहे. प्रशासनाने प्राध्यापकांची कमतरता हे घसरणीमागील प्रमुख कारण असल्याचे स्पष्टीकरण दिले असले तरी, यास विद्यापीठाचा नियोजनशून्य कारभारच जबाबदार असल्याचा आरोप विद्यार्थी संघटनांनी केला आहे. आता हाच मुद्दा अधिसभा सदस्यांनी उचलून धरला असून, प्रशासनाकडून



सविस्तर स्पष्टीकरण मागितले आहे.

अधिसभा सदस्य डॉ. अर्पणा लळिंगकर, दादाभाऊ शिनलकर, राहुल पाखरे यांच्यासह अनेक सदस्यांनी यावर प्रस्ताव सादर केले आहेत. विद्यापीठाची आंतरराष्ट्रीय स्तरावर जी ओळख आहे, तिला मानांकनामुळे धक्का बसला आहे. नेमक्या कोणत्या कारणांमुळे घसरण झाली, हे समजून घेणे आवश्यक आहे, अशी भूमिका सदस्यांची आहे. डॉ. लळिंगकर यांच्या ठरावात एक संशोधन समिती तातडीने स्थापून तिने चार महिन्यांत अहवाल सादर करावा. त्यांच्या शिफारशींची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी मागणी केली आहे. समितीत आयआयटीसारख्या नामांकित संस्थांमधील तज्ज्ञांचा समावेश असावा, असे शिनलकर यांनी ठरावात नमूद केले आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने विद्यार्थ्यांना एकाच वेळी नियमित आणि दूरस्थ अशा दोन्ही पद्धतींनी शिक्षणची मुभा दिली आहे. मात्र, विद्यापीठाकडून प्रवेशासाठी मूळ शाळा सोडल्याचा दाखला (टीसी व एलसी) मागितला जातो.

यामुळे नियमित अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना अडचण येते. ही अट रद्द करावी, असा ठराव अधिसभा सदस्य युवराज नरवडे यांनी मांडला आहे. मुलींना मोफत शिक्षण देण्याचा योजनेचा लाभ प्रत्येक विद्यार्थिनीपर्यंत पोहोचवण्यासाठी विद्यापीठाने ठोस पावले उचलावीत, असा ठराव ॲड. ईशानी जोशी यांनी मांडला आहे.

Pune City Edition
Sep 29, 2025 Page No. 15
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During September 2025*

## *Section: Education*

सकाळ

# 'नॅक' मूल्यांकनाची लवकरच नवी कार्यपद्धती

## डॉ. सहस्रबुद्धे यांचे सूतोवाच; केवळ ४०० विद्यापीठांकडून अंमलबजावणी

**पुणे, ता. २९ :** "देशात हजारो विद्यापीठे असूनही केवळ ४०० विद्यापीठांनीच नॅक मूल्यांकन केले आहे. देशभरातील सर्व महाविद्यालये, विद्यापीठांना नॅक मूल्यांकनाच्या कक्षेत आणण्यासाठी आता नॅक मूल्यांकन प्रक्रिया अधिक सुलभ, सुकर करण्यात येत असून, आता 'मॅच्युरिटी बेस्ड ग्रेडेड' पद्धती आणली जाईल. येत्या दोन ते तीन महिन्यांत नॅक मूल्यांकनाची नवी कार्यपद्धती जाहीर होणार आहे," असा सूतोवाच राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषदेच्या कार्यकारी समितीचे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या १२६व्या पदवीप्रदान कार्यक्रमात डॉ. सहस्रबुद्धे बोलत होते. या वेळी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक डॉ. प्रभाकर देसाई आदी उपस्थित होते. उद्योग क्षेत्रातील मूल्यांकनाच्या धर्तीवर विद्यापीठांना मूल्यांकन श्रेणी लागू करणार असल्याचेही डॉ. सहस्रबुद्धे यांनी नमूद केले.

राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी आराखड्याबाबत (एनआयआरएफ) डॉ. सहस्रबुद्धे म्हणाले,"देशात काही वर्षांपूर्वी विविध मासिकांद्वारे शिक्षण संस्थांची क्रमवारी जाहीर करण्यात येत होती. परंतु, या क्रमवारीला कोणताही आधार नव्हता. आता केंद्र सरकारने 'एनआयआरएफ' सुरू केले. विद्यार्थी-शिक्षक गुणोत्तर, अध्ययन निष्पत्ती अशा प्रमुख निकषांवर हे मूल्यांकन होते. विद्यापीठांनी माजी विद्यार्थी, उद्योग यांच्याशी नियमित संपर्क ठेवला पाहिजे. त्यातून प्रतिमा निर्मिती करणे, प्रतिमा उंचावणे शक्य होते."

या वेळी डॉ. गोसावी यांनी विद्यापीठाच्या कामगिरीचा आढावा घेतला. "पदवी ही केवळ ज्ञानाची खात्री नाही, तर ती जागतिक स्पर्धेला सामोरे जाण्याची तयारी आहे. जागतिक स्तरावर शिक्षित व्यक्तींची जबाबदारी फक्त आपला देश नाही, तर संपूर्ण मानवजातीच्या हितासाठी काम करणे, ही आहे. पदवी ही तुमच्या नेतृत्व क्षमतेला जागतिक स्तरावर सिद्ध करण्याची सुरुवात आहे," असे डॉ. गोसावी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले.

### 'नॅक' मूल्यांकनात असा होणार बदल

■ **"देशात आतापर्यंत सी, बी, ए, ए ++ अशा पद्धतीने शिक्षण संस्थांचे मूल्यांकन करण्यात येत आहे. पण अशा मूल्यांकनामुळे शिक्षण संस्थांमध्ये चुकीच्या दृष्टीने चुरस रंगू नये, म्हणून आता 'बेसिक ॲक्रिडेशन' पद्धती कार्यान्वित करण्यात येईल. नव्या प्रक्रियेमध्ये सी,बी, ए, ए+, ए++ याऐवजी एक, दोन, तीन, चार आणि पाच अशा स्तरावर मूल्यांकन देण्यात येईल. त्यात 'पाच' या स्तरावरील मूल्यांकन हे सर्वोत्कृष्ट असेल. येत्या दोन ते तीन महिन्यांत नॅक मूल्यांकनाची नवी कार्यपद्धती जाहीर केली जाईल. पुढील वर्षापर्यंत ही मूल्यांकन पद्धती कार्यान्वित होईल," असे डॉ. सहस्रबुद्धे यांनी स्पष्ट केले.**

Pune, Main
30/09/2025 Page No. 1

## *News Paper Clippings During September 2025*

### *Section: Education*

पुढारी

# नॅक मूल्यांकनाची नवी पद्धती लवकरच

## नॅक समितीचे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांची माहिती

पुणे : पुढारी वृत्तसेवा

**नॅक मूल्यांकनाची 'मॅच्युरिटी बेस्ट ग्रेडेड लेव्हल' ही नवी पद्धती पुढील दोन-तीन महिन्यांत उपलब्ध करून दिली जाणार आहे. सर्व शैक्षणिक संस्थांना नॅक मूल्यांकनासाठी आवश्यक असणारा डेटा सोप्या पद्धतीने भरता यावा, त्यात सुलभता यावी, शैक्षणिक संस्थांना कोणत्याही अडचणी येणार नाहीत, याबाबतची काळजी घेतली जात असल्याची माहिती राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषदेच्या (नॅक) कार्यकारी समितीचे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांनी दिली आहे.**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या १२६ व्या पदवीप्रदान समारंभ प्रसंगी डॉ. अनिल सहस्रबुद्धे बोलत होते. या वेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर, प्रभारी परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. प्रभाकर देसाई, वित्त व लेखा अधिकारी सीएमए डॉ. चारुशिला गायके आदी उपस्थित होते.



डॉ. अनिल सहस्रबुद्धे म्हणाले, सध्या देशातील केवळ १८ टक्के शैक्षणिक संस्था नॅक मूल्यांकनासाठी सहभागी होत आहेत. उर्वरित ८२ टक्के संस्था आत्तापर्यंत मूल्यांकनासाठी सहभागी झाल्या नाहीत. तर १२०० पैकी केवळ ४०० विद्यापीठांनी नॅक मूल्यांकन करून घेतले आहे. यापुढे बेसिक मूल्यांकन केले जाणार आहे. ए, बी, सी, ही ग्रेड पद्धती बंद केली जाणार आहे. पण चांगले विद्यापीठ व कॉलेजेस, इन्स्टिट्यूट यांना काहीतरी वेगळे पाहिजे, नाही तर सगळे जण एकच झाले, चांगला आणि वाईट एकाच तराजूमध्ये मोजायला सुरु केले तर आमचं काय होणार? असा प्रश्न निर्माण झाला. यामुळे डॉ. राधाकृष्णन कम्टिीने एक विशेष नवीन पद्धतीने मूल्यांकनाच्या व्यवस्थेबद्दल सांगितले आहे. त्याचं नाव मॅच्युरिटी बेस्ट ग्रेडेड लेवल्स असून, इंडस्ट्रीमध्ये जे जाणकार आहेत, त्यांना ही पद्धती माहिती आहे.

सीएमएम लेवल टू, लेव्हल थ्री, लेव्हल फोर, इंडस्ट्रींना केलं जातं. त्याचप्रमाणे शिक्षणक्षेत्रामध्ये आपल्या कॉलेज आणि युनिव्हर्सिटीसाठी ही पद्धती आणली जात आहे. फक्त आपल्या देशात नाही, पण पूर्ण जगामध्ये सर्वात उत्कृष्ट शैक्षणिक संस्थांनाच फाईव्ह लेव्हल दिली जाईल. चौथी श्रेणी आहे, ती श्रेणी देशांमधल्या सर्वोत्कृष्ट विश्वविद्यालयांना मिळाली पाहिजे आणि मग तीन आणि दोन हे त्याच्या खालचे असतील. लेव्हल वन आपल्या बेसिक मूल्यांकन मिळाल्यावर प्रयत्न करून दरवर्षी आणखीन चांगलं करत राहिल्यावर थोड्या वर्षांनी मॅच्युरिटी वाढल्यावर मिळणार आहे.

या एका नवीन संकल्पनेने आम्ही पुढच्या एक वर्षामध्ये सर्व गोष्टी आणणार आहेत. त्याच्याकडे पण सर्वांनी लक्ष ठेवावे. कॉलेजचे प्राध्यापक, प्रिन्सिपल्स आदींसाठी हे आवश्यक आहे. विद्यापीठाचे रँकिंग घसरल्याने प्रसारमाध्यमांतून विद्यापीठावर टीका केली जात आहे. पण विद्यापीठाने पुढील रँकिंगमध्ये अव्वल क्रमांक मिळवून टीकाकारांना उत्तर द्यावे, हाच योग्य मार्ग असेल, असे नमूद करून डॉ. सहस्रबुद्धे यांनी परसेप्शनबाबत कोणत्या उपाययोजना कराव्यात, यावर सविस्तर माहिती दिली.

Pune Edition
Sep 30, 2025 Page No. 07
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During September 2025*

## *Section: Education*

पुढारी




**पदवीप्रदान सोहळ्यात विद्यार्थ्यांचा सन्मान करताना उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, डॉ. अनिल सहस्रबुद्धे, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांच्यासह अन्य मान्यवर.**

# विद्यापीठाला प्रतिमा उंचावण्याची गरज

## उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांचा विद्यापीठ प्रशासनाला सल्ला

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

'एनआयआरएफ रँकिंग'मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे स्थान घसरण्याचे खापर उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी विद्यापीठाच्या प्रतिमेवर फोडत विद्यापीठाला प्रतिमा उंचावण्याचा सल्ला दिला आहे. तसेच प्राध्यापकांची संख्या कमी असल्याचे मान्य करत त्यांनी राज्याच्या काही आर्थिक, नियमांतील अडचणी असल्याचीही कबुली दिली. या अडचणींवर मात करून येत्या महिन्याभरात ही प्रक्रिया मार्गी लागणार असल्याचेदेखील पाटील यांनी स्पष्ट केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या १२६ व्या पदवी प्रदान कार्यक्रमात पाटील बोलत होते. 'नॅक'च्या कार्यकारी समितीचे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्रबुद्धे, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई आदी या वेळी उपस्थित होते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे, सुवर्णपदके प्रदान करण्यात आली.

पाटील म्हणाले, जागतिक स्तरावर विद्यापीठाची क्रमवारी उंचावली, देशपातळीवर खाली गेली. दोन्हींकडे मूल्यांकनाचे निकष वेगळे आहेत. समाजमाध्यमांतून मानांकन वाढल्याचे कौतुक नाही, पण मानांकन खाली आल्यावर शोधून शोधून टीका केली जाते. हा समाजमाध्यमाचा स्वभाव आहे, पण निंदकाचे घर असावे शेजारी. आपल्याकडे काय कमी आहे हे आपल्यालाही कळते. विद्यापीठातील १११ प्राध्यापकांच्या भरतीला मान्यता मिळून दीड वर्ष झाले, पण काही नियमांच्या अडचणी आल्या आहेत. सगळ्या अडचणींवर मात करून महिन्याभरात ते सगळे मार्गी लागेल. मानांकनासाठी तेवढा एकच निकष असतो का, क्रमवारीबाबत मुख्यमंत्रीही चिंतेत पडले. त्यामुळे याबाबत बरीच चर्चा केली. यात वेगवेगळे वीस निकष आहेत. त्यातील एक आहे, विद्यापीठाच्या प्रतिमेचा. मीही विद्यार्थी चळवळीतून आलो आहे. विद्यार्थी, प्रश्न, आंदोलने या विरोधात मी नाही. पण आंदोलनांचे स्वरूप कसे असावे, समन्वयाने प्रश्न सोडवता येतील का, याचा विद्यापीठानेही प्रयत्न करावा, असेही पाटील यांनी नमूद केले. कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यापीठाच्या शैक्षणिक, संशोधनात्मक कामगिरीचा आढावा मांडला.

Pune Edition
Sep 30, 2025 Page No. 07
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During September 2025*

## *Section: Education*

सामना

### 'नॅक' मूल्यांकनासाठी लवकरच नवी पद्धत

**पुणे :** 'नॅक' मूल्यांकनाची नवी पद्धती 'मॅच्युरिटी बेस्ट ग्रेडेड लेव्हल' (MBGL) ही पुढील दोन-तीन महिन्यांत उपलब्ध करून दिली जाणार आहे. सर्व शैक्षणिक संस्थांना 'नॅक' मूल्यांकनासाठी आवश्यक असणारा डेटा सोप्या पद्धतीने भरता यावा, त्यात सुलभता यावी, शैक्षणिक संस्थांना कोणत्याही अडचणी येणार नाहीत, याबाबतची काळजी घेतली जात आहे. सध्या देशातील केवळ १८ टक्के शैक्षणिक संस्था 'नॅक' मूल्यांकनासाठी सहभागी होतात. उर्वरित ८२ टक्के संस्थान आत्तापर्यंत मूल्यांकनासाठी सहभागी झाल्या नाहीत. तर, १२००पैकी केवळ ४०० विद्यापीठांनी नॅक मूल्यांकन करून घेतले आहे. मात्र, लवकरच सर्व संस्थांना मूल्यांकनासाठीची नवी पद्धत उपलब्ध करून दिली जाईल, असे राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषदेच्या (नॅक) कार्यकारी समितीचे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांनी सोमवारी सांगितले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या १२६व्या पदवीप्रदान समारंभाप्रसंगी डॉ. अनिल सहस्रबुद्धे बोलत होते. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर, प्रभारी परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. प्रभाकर देसाई, वित्त व लेखा अधिकारी 'सीएमए' डॉ. चारुशीला गायके, सर्व अधिष्ठाता, सर्व व्यवस्थापन परिषद, विद्यापरिषद व अधिसभा सदस्य, प्रशाळांचे संचालक, विभागप्रमुख, पदवीधर विद्यार्थी आणि त्यांचे पालक उपस्थित होते.

डॉ. अनिल सहस्रबुद्धे म्हणाले, 'यापुढे बेसिक मूल्यांकन केले जाणार आहे. 'ए', 'बी', 'सी' ही ग्रेड पद्धती बंद केली जाणार आहे. विद्यापीठाचे रँकिंग घसरल्याने प्रसारमाध्यमांतून विद्यापीठावर टीका केली जात आहे; पण विद्यापीठाने पुढील रँकिंगमध्ये अव्वल क्रमांक मिळवून टीकाकारांना उत्तर द्यावे, हाच योग्य मार्ग असेल,' असे नमूद करून अनिल सहस्रबुद्धे यांनी परसेप्शनबाबत उपाययोजना कराव्यात, यावर माहिती दिली.

या समारंभात ७८ हजार ६०९ विद्यार्थ्यांना पदवी, १९ हजार ५७७ पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र, २७० पदविका प्रमाणपत्र, २५९ पीएच.डी., १०३ पदव्युत्तर पदवी-पदविका प्रमाणपत्रे देण्यात आली.

Pune Edition
Sep 30, 2025 Page No. 10
Powered by: erelego.com

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे.
www.dainikprabhat.com

### नॅक मूल्यांकन प्रक्रिया सहज, सोपी करणार

#### डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांची घोषणा

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २९** - देशतील ८२ टक्के शिक्षण संस्था अद्याप राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषदेच्या (नॅक) मूल्यांकनाबाहेर आहेत. देशातील सर्व महाविद्यालये व विद्यापीठे मूल्यांकनाच्या कक्षेत आणण्यासाठी नॅक प्रक्रिया सुलभ आणि सोपी करणार आहे. येत्या दोन ते तीन महिन्यांत मूल्यांकनाची नवीन कार्यपद्धती जाहीर होईल, अशी घोषणा नॅकच्या कार्यकारी समितीचे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्रबुद्धे यांनी केली.

पुणे विद्यापीठाच्या १२६ व्या पदवीप्रदान कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. डॉ. सहस्रबुद्धे म्हणाले, देशात केवळ ४०० विद्यापीठांनीच नॅक मूल्यांकन केले आहे. बहुसंख्य संस्था या प्रक्रियेपासून दूर आहेत. कंपन्यांच्या मूल्यांकनाच्या धर्तीवर विद्यापीठांसाठी मूल्यांकन श्रेणी लागू होईल. आता 'एनआयआरएफ' ही एक विश्वासार्ह क्रमवारी उपलब्ध आहे. विद्यापीठांनी माजी विद्यार्थी, उद्योग जगताशी नियमित संपर्क ठेवला पाहिजे, असा सल्लाही त्यांनी दिला.

#### एआयचा वापर, पण...

एआय कितीही विकसित झाले, तरी ते माणुसकी शिकवू शकत नाही. त्यासाठी मानवी शिक्षक, गुरूंचीच आवश्यकता आहे. शिक्षकांनी एआयला घाबरून न जाता त्याचा शिक्षणात प्रभावी वापर केला पाहिजे. शेती, शाश्वत शहरे आणि आरोग्य क्षेत्रांत एआय वापरासाठी आयआयटी, एम्स येथे एआय उत्कृष्टता केंद्र स्थापन केले आहेत. याच धर्तीवर शिक्षणात एआयचा वापर वाढवण्यासाठी उत्कृष्टता केंद्राची घोषणा होईल, असे सहस्रबुद्धे म्हणाले.

Pune City Edition
Sep 30, 2025 Page No. 15
Powered by: erelego.com

# *Upcoming Events*

## October 2025

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 ***Mahatma Gandhi Jayanti and Lal Bahadur Shashtri Jayanti***   | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 ***Maharshi Valmiki Jayanti***  | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 ***Dr. A.P.J.Abdul Kalam Jayanti***  | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | 31 ***Indira Gandhi Punyatithi and Vallabhbhai Patel Jayanti***   | | |




***Other than the Photos of Modern College Pune-5 and Event Photos, Newspaper clipping images, all other images in this Bulletin Issue are downloaded from Google Images., Pinterest, Freepik.com***